सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

# (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**गोंदिया येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालय, वन विभाग कार्यालय, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा**

# पहिला अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास दिनांक मार्च, २०२२ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई /नागपूर

मार्च, २०२२

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

**(२०२०-२०२१)**

(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**गोंदिया येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालय, वन विभाग कार्यालय, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा**

**पहिला अहवाल**

एचबी २१४१-१

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०२०-२०२१)

**समिती प्रमुखः-**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स.

**सदस्यः-**

(२) श्री. श्रीनिवास वनगा, वि.स.स.
(३) श्री. महेंद्र दळवी, वि.स.स.
(४) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(५) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.
(६) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स.
(७) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(८) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.
(९) श्री. राजेश पाडवी, वि.स.स.
(१०) श्री. भिमराव केराम, वि.स.स.
(११) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.
(१२) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.
(१३) श्रीं. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.
(१४) श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.
(१५) श्री. किरण सरनाईक, वि.प.स.
*(१६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. (विशेष निमंत्रित सदस्य)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. मोहन काकड, अवर सचिव
(४) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी

* मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी सन २०२०-२०२१ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या अनुसूचित जमाती कल्याण समितीवर “विशेष निमंत्रित सदस्य” म्हणून श्री. बाळाराम पाटील, वि.प.स. यांची दिनांक ११ फेब्रुवारी, २०२१ रोजी नामनियुक्ती केलेली आहे.

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुख :–**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

**सदस्य :–**

**(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
*(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

**टीप :—**

*(१) मा.अध्यक्षांनी श्री.पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांची दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी रिक्त असलेल्या जागेवर समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

**(२) मा.अध्यक्ष यांनी, श्री. डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स. यांची दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| | **प्रस्तावना** | | (चार) |
| (१) | जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया | . . . | १ |
| (२) | वन विभाग कार्यालय, गोंदिया | . . . | ४ |
| (३) | जिल्हा परिषद, गोंदिया | . . . | १६ |
| (४) | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया. | . . . | ३० |
| (५) | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, (देवरी) | . . . | ३३ |
| (६) | समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | . . . | ४७ |

**प्रस्तावना**

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ या कालावधीत गोंदिया जिल्ह्यास भेट देऊन बैठका घेतल्या होत्या. उक्त बैठकींत गोंदिया येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद, वन विभाग कार्यालय, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय देवरी या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणाऱ्या शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्या वेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्द्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी उक्त आस्थापनासंदर्भात संबंधित मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारविनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन :** **दौलत दरोडा,**
मुंबई, समिती प्रमुख,
दिनांक : १६ मार्च, २०२२. अनुसूचित जमाती कल्याण समिती.

## अहवाल

## जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ या कालावधीत गोंदिया जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौऱ्यात समितीने दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयास भेट देऊन बैठक घेतली होती. सदर बैठकीत समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

### जिल्हाधिकारी कार्यालयातील भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :

सदर बैठकीत समितीने, जिल्हाधिकारी कार्यालयात वर्ग १ ते वर्ग ४ मधील किती पदे मंजूर आहेत. त्यात अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी किती पदे आहेत, तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील अव्वल कारकून ३ पदे व तलाठी १ पद केव्हापासून रिक्त आहे, सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. अव्वल कारकून संवर्गाची एकूण ९२ पदे मंजूर असून अनुसूचित जमातीसाठी ६ पदे राखीव आहेत. त्यापैकी ३ पदे भरलेली असून ३ पदे रिक्त आहेत. अव्वल कारकून या पदावर पदोन्नती देत असताना महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण असावी लागते किंवा वयाची ४५ वर्षे पूर्ण केलेली पाहिजे. अनुसूचित जमाती प्रवर्गातील कनिष्ठ लिपिकास अव्वल कारकून पदावर पदोन्नतीकरिता महसूल अर्हता परीक्षा पास असलेला किंवा त्याने वयाची ४५ वर्षे पूर्ण केली असल्यास त्याला त्यातून सूट मिळते. परंतु कर्मचारी न मिळाल्यामुळे सदरची ३ पदे रिक्त राहिलेली आहेत. मंडळ अधिकारी संवर्गात ३५ पदे असून २ पदे मंजूर असून सदरहू पदे भरलेली आहेत. कनिष्ठ लिपिक संवर्गामध्ये १३१ पदे मंजूर आहेत. त्यापैकी अनुसूचित जमातीची १० पदे मंजूर असून सदरहू पदे भरलेली आहेत. तलाठी संवर्गातील २०३ पदे असून त्यापैकी अनुसूचित जमातीसाठी १४ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ पदे भरण्यात आलेली आहेत व १ पद रिक्त आहे. या जिल्ह्यामध्ये एकूण १४ पदे रिक्त आहेत. त्यात अनुसूचित जातीतील ३, अनुसूचित जमातीची १, ओबीसी प्रवर्गातील ६ आणि खुल्या गटातील ६ अशी एकूण १४ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे भरण्याकरिता परवानगी मागितलेली आहे. सदरहू परवानगी मिळाल्यानंतर जाहिरात देण्यात येणार आहे. वाहन चालकांची १४ पदे मंजूर असून त्यातील १ पद अनुसूचित जमातीसाठी राखीव असून सदरहू पद भरलेले आहे.

**जात वैधता प्रमाणपत्राबाबत :—**

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी वर्गाची किती प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत, असल्यास त्याची कारणे काय, त्यासंदर्भात कार्यालयाने कोणते प्रयत्न केले तसेच जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्या कर्मचाऱ्याविरुद्ध कोणती कारवाई केली अशी विचारणा केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, जातपडताळणीची ३ प्रकरणे होती. त्यापैकी श्रीमती अनिता कुथीरकर यांचे जात प्रमाणपत्र वैध ठरले आहे. श्री. अजय राजाराम सुतनागे यांचे जात प्रमाणपत्र तांत्रिक आधारावर खारीज करण्यात आले आहे. श्री. एच. व्ही. शहारे यांना दिनांक ३१ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या आदेशान्वये अपात्र ठरविण्यात आले होते. त्यानंतर त्यांनी नागपूर येथील उच्च न्यायालयामध्ये रिट याचिका क्र.१८०/२०१६ दाखल केली आहे. नागपूर खंडपीठाने दिनांक ३१ नोव्हेंबर, २०१५ च्या आदेशाला दिनांक ९ फेब्रुवारी, २०१६ च्या आदेशान्वये स्थगिती दिली असून उक्त प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

समितीने दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयातील तरतुदी निदर्शनास आणून दिल्या व निदेश दिले की, नियुक्ती दिलेल्या उमेदवाराने ६ महिन्यांत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे अन्यथा सेवा समाप्त करण्यात यावी. त्यानुषंगाने समितीने पृच्छा केली की, उक्त शासन निर्णयानुसार सदरहू कर्मचारी यांचेविरुद्ध ६ महिन्यांच्या कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे कारवाई का करण्यात आली नाही, त्यांच्यावर वेळेत कारवाई झाली असती तर त्यांना न्यायालयामध्ये जाता आले नसते. अनुसूचित जमातीच्या उमेदवारास त्याच्या हक्काची संधी प्राप्त झाली असती. बोगस प्रमाणपत्राच्या आधारे काही उमेदवार अनुसूचित जमातीच्या उमेदवारांच्या जागेवर घुसखोरी करतात. सदरहू प्रकरणी तातडीने कारवाई करणे आवश्यक होते. यावर जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, संबंधित कर्मचाऱ्यांनी ६ महिन्यांच्या आत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते ते त्यांनी सादर केले नाही, ही वस्तुस्थिती आहे. तथापि दिनांक ३१ नोव्हेंबर, २०१५ रोजी जात पडताळणी समितीचे आदेश प्राप्त झाल्याने उक्त कर्मचारी यांचेविरुद्ध कारवाई करण्यात आली नाही.

नागपूर खंडपीठाने स्थगिती आदेशामध्ये उक्त उमेदवारास जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्यास ६ महिने किंवा १ वर्षाचा कालावधी देण्यात यावा, असे नमूद केले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी विदित केले की, उक्त उमेदवाराची नियुक्ती आदेश व स्थगिती आदेशाची प्रत समितीला सादर करतो.

**अभिप्राय व शिफारशी :—**

दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमाती प्रवर्गात नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्याचे जातप्रमाणपत्र अवैध ठरविले तर किंवा जर नियुक्तीपासून सहा महिन्यांच्या आत प्रमाणपत्र दिले नाही तर त्या दिवसापासून त्यांची सेवा समाप्त करण्याची तरतूद शासन निर्णयामध्ये असतांनाही कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीपत्रामध्ये संबंधित आस्थापनाकडून सदर बाब नमूद करण्यात आलेली नाही. अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती केल्यानंतर विहित मुदतीत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याची जेवढी जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यांची आहे तेवढीच शासन निर्णयाच्या अधीन राहून प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची संबंधित प्रशासनाची जबाबदारी आहे. अवैध प्रमाणपत्रांच्या आधारे गैर आदिवासींनी नोकरीचा फायदा घेतला असल्यास त्यांच्यावर वेळीच कारवाई होणे बंधनकारक आहे. गोंदिया जिल्ह्यात बहुतेक आस्थापनाने या निर्णयाचे उल्लंघन केल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. **मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीचा निर्णय तसेच राज्य शासनाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार जात पडताळणी प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरिता अधिसंख्य पदावर नियुक्ती करण्यात यावी व अनुसूचित जमातीच्या पदांचा बिंदू रिक्त करून त्या पदांवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करण्यात यावी तसेच दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या सर्वोच्च मा. न्यायालयाच्या निर्णयाअगोदर सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून जातपडताळणी प्रमाणपत्र घेण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरसुद्धा कारवाई करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

## वन विभाग कार्यालय, गोंदिया

### वन विभागांतर्गत येणाऱ्या भरती, बढती, आरक्षण व अनुशेष :—

समितीने, वर्ग ३ मधील लिपिक १, व वनरक्षक २ ही पदे विशेष व्याघ्र संरक्षण दलातील वनरक्षक २ पदे तसेच वर्ग ४ मधील शिपाई १ पद, चौकीदार १ पद, अशी २ पदे किती कालावधीपासून रिक्त आहेत व अद्यापपर्यंत न भरण्याची कारणे काय आहेत, सदरहू पदे केव्हा भरण्यात येतील. याबाबत माहिती विचारली असता सहायक वन संरक्षकांनी माहिती दिली की, लिपिक, वनरक्षक, वाहन चालक, शिपाई, माळी, खलाशी, सफाईदार व चौकीदार ही पदे वन संरक्षक यांच्या स्तरावर भरली जातात. इतर पदे शासनस्तरावर भरली जातात. सन २०१६ मध्ये पद भरती झाली होती. त्यावेळी अंशकालीन आणि माजी सैनिक यातून उमेदवार उपलब्ध झाले नसल्यामुळे ही पदे रिक्त आहेत. शिपाई पदावरील श्री. ऊईके नावाच्या कर्मचाऱ्याची पदोन्नती झाल्याने दिनांक २३ नोव्हेंबर,२०१५ पासून हे पद रिक्त आहे. तसेच चौकीदार या पदावरील श्री. वलठे हे सेवानिवृत्त झाल्यामुळे हे पद रिक्त झालेले आहे.

### जात वैधता प्रमाणपत्र :—

श्री. एच. एन. शिकारे, वनरक्षक यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत कोणती कारवाई केलेली आहे. याबाबत समितीने विचारणा केली असता सहायक वन संरक्षकांनी विदित केले की, श्री. एच. एन. शिकारे, वनरक्षक यांचे प्रमाणपत्र रद्द करण्यात आलेले आहे. त्यांना सेवेतून बडतर्फ करण्याबाबत दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी त्यांचे प्रमाणपत्र रद्द करण्याबाबतचे पत्र पाठविले होते. वनरक्षक श्री. मेथलवाड, यांना कारणे दाखवा नोटिस दिलेली आहे, समितीने याबाबत विचारणा केली की, दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाच्या अधीन राहून नियुक्ती दिली असेल तर संबंधिताने सेवेत रुजू झाल्यावर ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल, असे नियुक्ती पत्रामध्ये नमूद केलेले असते. असे असताना त्यांना केवळ कारणे दाखवा नोटीस कोणत्या आधारावर देण्यात आली. आरक्षणाचा लाभ घेऊन सेवेत रुजू होणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला शासन निर्णयाच्या अधिन राहूनच पुढील ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावी लागते. नियुक्तीपत्रामध्ये तसा उल्लेख केला नसेल तर तसा उल्लेख करणे आवश्यक होते. शासन निर्णयाची अंमलबजावणी योग्य प्रकारे न करता शासन निर्णयाची अवहेलना करण्याचे काम वन विभागामार्फत सुरू आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे असे मत व्यक्त केले असता सहायक वन संरक्षकांनी विदित केले की, सन २०१३ च्या शासन निर्णयानुसार विहित कालावधीत जात वैधता

प्रमाणपत्र सादर करण्यात आले नाही. उक्त उमेदवारांनी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१७ रोजी पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ सादर करावे अन्यथा नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी, अशी नोटीस दिली आहे. त्यानंतर त्यांनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी जात पडताळणी समिती, औरंगाबाद यांचेकडे प्रस्ताव सादर केला असून ऑनलाईन जात पडताळणी प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केल्याची प्रत सादर केली आहे.

**बिंदू नामावली :—**

समितीने, वर्ग ३ मधील लिपिक व वाहन चालक संवर्गातील बिंदूनामावली माहे सप्टेंबर, २०१७ नंतर सहायक आयुक्त मागासवर्ग कक्षाने न तपासण्याची कारणे काय आहेत तसेच बिंदूनामावली तपासणी केव्हा करण्यात आली असे विचारले असता उपायुक्त, मागासवर्ग कक्ष यांनी सांगितले की, वन विभागाच्या बिंदूनामावली तपासणीची माहिती आता उपलब्ध नाही. तथापि, सर्व विभागांनी बिंदूनामावल्या अद्ययावत करून घ्याव्यात, असे दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. परंतु वन विभागाकडून माहिती प्राप्त झाली नाही यावर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, लिपिक संवर्गाची बिंदूनामावली माहे डिसेंबर, २००९ मध्ये तपासून घेतलेली आहे. वनरक्षक पदाची बिंदूनामावली माहे डिसेंबर, २०१४ मध्ये व सन २०१६ पर्यंतची बिंदूनामावली तपासण्याकरिता कालची तारीख देण्यात आली होती.

**वन विभागामार्फत राबवावयाच्या योजना :—**

समितीने वन विभागातील सन २०१४-१५, २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षातील प्राप्त निधी किती व खर्चीत निधी किती या संदर्भातील माहिती देण्यास सांगितले असता सहायक वन संरक्षकांनी समितीस अवगत केले की, आदिवासी विकास योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये निकृष्ट वनांचे वनीकरण करण्यास ९.५० हेक्टरवर रोपांची लागवडीसाठी जमीन घेण्यात आली. त्यासाठी रु.३३.४८ लाख खर्च झालेला आहे. औद्योगिक व व्यापारी यासाठी वृक्ष लागवड या अंतर्गत १५२ हेक्टरवर वृक्ष लागवड करण्यात आली आहे. गेल्यावर्षी ८ लाख वृक्ष लागवडीचे उद्दीष्टे होते. या वर्षी १३ कोटी वृक्ष लागवडी अंतर्गत १०.७० लाख रोपांचे उदिष्ट आहे. गोंदिया जिल्ह्यासाठी एकूण उद्दिष्ट ३१ लाख ६४ हजार ५०० चे होते. या माध्यमातून जास्तीत जास्त उद्दिष्टे गाठायचे आहे अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या असल्यामुळे जिल्हा स्तरावर ४५ लाख ३० हजार २२५ वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण केलेले आहे. यावर्षी ग्रामपंचायतीना ५ लाख ९९ हजार ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट दिले आहे.

आदिवासी योजनेच्या माध्यमातून सन २०१५-१६ मध्ये महागाव येथे आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी बांबूचे शेड उभारलेले आहे, असे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीस अवगत केले असता यावर समितीने, सदर योजनेमध्ये ग्रामपंचायत व शाळा यांचा समावेश करावा अशी सूचना केली. ४५ लाख ३० हजार वृक्ष लागवडीचा हा आकडा फार मोठा असल्यामुळे गोंदिया जिल्ह्यामध्ये वृक्ष लागवड ही मोठ्या प्रमाणावर करणे आवश्यक होते. यामध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीने वृक्ष लागवडीचे एक उद्दिष्टे ठरवून घ्यावे व त्यानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीने कमीत कमी २५ हजार वृक्ष लागवड करणे आवश्यक होते.

समितीने, गॅस वाटप योजनेचे प्रारुप काय आहे, गॅस वाटपामध्ये लाभार्थ्यांना कोणकोणत्या वस्तू देण्यात येतात अशी विचारणा केली असता उप वनसंरक्षकांनी अवगत केले की, या योजनेमध्ये गॅस सुरु करण्यास ज्या वस्तू आवश्यक आहेत त्या सर्व वस्तूंचा संच लाभार्थ्यांना दिला जातो. या योजनेअंतर्गत पहिल्या वर्षी १२, दुसऱ्या वर्षी ८, तिसऱ्या वर्षी ६ आणि चौथ्या वर्षी ४ अशाप्रकारे सिलेंडर वाटप करण्यात येते. जवळच्या असलेल्या गॅस एजन्सीच्या माध्यमातून सर्व गॅस सिलेंडर संबंधित लाभार्थ्यांना वितरित केले जातात. लाभार्थ्यांनी त्यांच्याकडील २५ टक्के रक्कम वन विभागाकडे दिली तर ती रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या शासकीय खात्यामध्ये जमा केली जाते. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी जी रक्कम लागेल ती रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समितीकडून दिली जाते.

यासंदर्भात समितीने पुढील प्रमाणे अभिप्राय दिले की, एकदा गॅस जोडणी घेतली की, पुढील कार्य गॅसची टाकी पुरवठ्याबाबतचा असतो. राज्यात अतिशय दुर्गम भागामध्ये गॅसचे वितरण झालेले आहे. या योजनेचा हेतू हाच आहे वृक्षतोड थांबली पाहिजे व वृक्षसंवर्धन झाले पाहिजे आणि त्यामुळेच ही योजना राबविण्याची कार्यवाही वन विभागाकडे देण्यात आलेली आहे. परंतु वन विभागाकडून लाभार्थ्यांचा व शासनाचा हिस्सा घेऊन केवळ ४ हजार रुपये भरुन गॅसची जोडणी केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे परंतु गॅस संपल्यावर गॅसचे सिलेंडर पुन्हा भरण्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी किंवा त्याहीपेक्षा लांब जावे लागते. याबाबत समितीकडे राज्यभरातून तक्रारी येत आहेत. आदिवासींना अतिदुर्गम भागातून गॅसचे सिलेंडर आणता येत नाही. कधीतरी महिन्यातून, दोन महिन्यातून गाडी येते व तेव्हा ते घेतात. त्यामुळे १२ टाक्या किंवा ८ टाक्या याप्रमाणे ४ वर्षांचा कोटा पूर्ण होत नाही. हे पैसे वन व्यवस्थापन समितीच्या खात्यामध्ये आहेत. परंतू गरजू लाभार्थ्यांना गॅस टाक्या मिळत नाही. त्यामुळे लोक नाईलाजाने पुन्हा जंगल तोडीकडे वळतात. लोक पुन्हा वृक्ष तोडीकडे वळतील. याकडे वन विभागाने गांभीर्याने लक्ष द्यावे समितीच्या असे ही निदर्शनास आले आहे की, विशेषतः जंगलाच्या बाजूला असलेल्या लाभार्थ्यांची

निवड केली जाते. यामध्ये दोन बाबी आहेत. वन व्यवस्थापन समिती लाभार्थ्यांना पैसे देत नाही आणि पैसे दिलेले असेल तर गॅस एजन्सी पैसे काढून घेते. त्यामुळे गॅस पुरवठ्याच्याबाबत उप वनसंरक्षकांनी व्यक्तीशः लक्ष घालावे, असे समितीने निर्देश दिले.

आदिवासी लाभार्थ्यांना वन पट्टे वाटप केलेले आहेत काय व त्यांची संख्या किती आहे तसेच आदिवासी लाभार्थ्याना जमिनीचा ताबा देऊन ७/१२ वाटप करण्याचा कार्यक्रम झालेला आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, जिल्हास्तरीय समितीकडे आदिवासींनी केलेल्या दाव्यांची ४ हजार १०५ प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी ३ हजार ९०६ प्रकरणे मान्य झालेली आहेत यासाठी २ हजार ५०८.८८१ हेक्टर जमीन असून निकाली निघालेली प्रकरणांची टक्केवारी ९५ टक्के आहे. तसेच ७/१२ वर नोंद घेण्याची कार्यवाही झालेली आहे. दावे मंजूर झाल्यामुळे वनपट्टा त्यांच्या ताब्यात आहे. एकूण ८ हजार ९६८ प्रकरणे मंजूर आहेत. त्यापैकी ८ हजार ३६१ दाव्यांमध्ये ७/१२ मध्ये नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोंदीनुसार २१ हजार ७३९ दावे ग्रामसभेकडे आहेत.

वन पट्टयाचा दावा आल्यानंतर त्याची प्रथम वन हक्क समिती खात्री करते. नंतर आमसभेकडे गेल्यानंतर स्थानिक प्राधिकारी पाहणी करुन प्रपत्र भरुन देते आणि त्यानंतर ते समितीकडे जाते. ग्रामसभेकडे जे दावे दाखल केले जातात त्यातून ग्राम समितीमध्ये किंवा प्रांताधिकारी स्तरावर फेटाळण्यात आलेले दावे येत नाहीत. स्थानिक वन अधिकाऱ्याकडून दावे मंजूर केल्यानंतर प्रकरण तहसीलदाराकडे जाते व नंतर तलाठ्याकडे जाते आणि तेथे ७/१२ व इतर हक्क यांच्या नोंदी केल्या जातात. काही ठिकाणी अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत की, त्यांच्या ७/१२ वर नोंदी केलेल्या नव्हत्या. अशा ३-४ ठिकाणी नोंदी आल्या होत्या. त्याची खात्री करून त्या नोंदी ७/१२ वर केलेल्या आहेत.

गोंदिया जिल्ह्यात पर्यटन वाढीच्या दृष्टीने कोणत्या योजना घेण्यात आल्या आहेत असा प्रश्न समितीने केला असता सहायक वन संरक्षकांनी अवगत केले की, पर्यटन वाढीसाठी हाजरा फॉल गोंदिया नावाचे स्थळ आहे. हे स्थळ काही कालावधी पर्यंत दुर्लक्षित होते. ते आता चांगले नावारुपाला आलेले आहे. या स्थळाकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निधी मिळालेला आहे. या ठिकाणी रोपवे करण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात आलेला असून त्याकरिता राज्य शासनाने ३ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. त्यामुळे हे पर्यटन स्थळ देशपातळीवर नावारुपास येईल, अशी अपेक्षा आहे, तसेच देवरी तालुक्यामध्ये दासगड नावाचे क्षेत्र आहे. दासगडचा विकास पर्यटनाच्या दृष्टीने केला जाऊ शकतो. तेथेही रोपवे टाकता येऊ शकतो व तसे झाले तर पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल आणि स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊन त्या भागाचा विकास होण्यास मोठी

मदत होऊ शकेल. त्याचप्रमाणे वन विभागाकडून घेतल्या जाणाऱ्या कामामध्ये मजुरीच्या रुपामध्ये अनेक आदिवासी बांधवाना रोजगार मिळत असतो.

आदिवासी विभागाकडून वन विभागाला मोठ्या प्रमाणात निधी दिला जातो तरी आदिवासी वाड्या, वस्त्या ह्या जंगलामध्येच आहेत व तेथील आदिवासी बांधवांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आतापर्यंत वन विभागाने वन्यजीव तसेच वृक्ष लागवड याकरिता मोठ्या प्रमाणात आदिवासी उपयोजना व बाह्य उपयोजनेअंतर्गत मिळणारा निधी खर्च केलेला आहे. वास्तविक पाहता आदिवासीच्या रोजगारासाठी वन विभागाकडूनच निधी खर्च होणे अपेक्षित होते. परंतु वन विभागाने त्याकरिता आदिवासी विभागाकडून आदिवासींकरिता दिलेला पैसा खर्च केलेला आहे. आदिवासी विभागाच्या निधीतून स्थानिक आदिवासी लोकांना व त्यांच्या मुलांना रोजगाराचे साधन उपलब्ध झाले पाहिजे, तसेच आदिवासी शेतकऱ्यांनाही निधीचा लाभ मिळाला पाहिजे होता. परंतु, वन विभागाची गॅस वाटपाची योजना वगळता आदिवासी बांधवांसाठी कोणतीच दुसरी योजना दिसून आली नाही.

आदिवासी बांधवांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध होईल, अशी एकही योजना वन विभागाने राबविलेली नाही, असे स्पष्टपणे आढळून येत आहे. केवळ तात्पुरत्या स्वरुपाच्या योजना आहेत. आदिवासींकरिता कायमस्वरुपी उत्पन्नाचे साधने उपलब्ध करुन दिली पाहिजे. आजपर्यंत त्या त्या भागातील आदिवासी बांधवांनीच नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन केलेले आहे. आदिवासींमुळेच वन विभागाचा वृक्ष लागवडीचा कार्यक्रम असो की वन संवर्धनाचा कार्यक्रम असो त्याच्यामुळे ते शक्य झाले आहे. त्यामुळे रोजगार वाढविण्याच्या दृष्टीने तसेच पर्यटन विकासाच्या योजना किंवा इतर छोटया योजना राबवून आदिवासी बांधवांना कायमस्वरुपी रोजगार उपलब्ध करुन देण्याचे अभिप्राय समितीने व्यक्त केले असता समितीच्या सूचनेप्रमाणे आवश्यक ती तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे सहायक वनसंरक्षकांनी समितीला आश्वासित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष** :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ या कालावधीत गोंदिया जिल्ह्यास दिलेल्या भेटीसंदर्भात दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी संबंधित विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्यावेळी समितीने वन विभागातील श्री. एच. एन. शिकारे, वनरक्षक यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र रद्द केल्याने त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे काय, तसेच श्री. मेथलवाड, वनरक्षक हे सेवेत रुजू झाल्यानंतर अडीच वर्षानंतर विलंबाने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले, संबंधित कर्मचाऱ्यांकडून वेळेवर जात वैधता प्रमाणपत्र न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत समितीने सूचना केल्या होत्या, या अनुषंगाने

कोणती कारवाई करण्यात आली अशी विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, गोंदिया जिल्ह्यामध्ये एकूण तीन कर्मचाऱ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध असल्याचे कळविण्यात आले होते. उप वनसंरक्षक, गोंदिया यांच्या स्तरावरुन उक्त कर्मचाऱ्यांना सेवेतून काढण्याची दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजी कारवाई करण्यात आली आहे. याप्रकरणी कारवाई करण्यात थोडा विलंब झाला असल्याची बाब सचिवांनी मान्य केली परंतु कारवाई करण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांना खुलासा सादर करण्याची नोटीस दिली होती. त्यांच्याकडून खुलासा सादर होण्यास विलंब झाला. उक्त कर्मचाऱ्यांना समितीच्या दौऱ्याच्या कालावधीत म्हणजेच दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस दिली होती. परंतु त्यांनी सादर केलेल्या खुलाशात जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केल्याचे नमूद केले होते. तद्नंतर ६-८ महिन्यानंतर त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले. त्यामुळे उक्त कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले.

यावर समितीने विभागाने केलेल्या कारवाईच्या पूर्ततेबाबत समितीला काहीही कळविण्यात आले नाही. समितीने साक्ष आयोजित केल्यानंतर कारवाई करण्यात आली आहे. विभागाकडून प्रशासकीय कार्यवाही वेळेत न केल्यामुळे बोगस कर्मचाऱ्यांना न्यायालयात जात पडताळणी समितीच्या निर्णयाविरोधात दाद मागण्याची संधी मिळता कामा नये, खऱ्या आदिवासीच्या जागेवर बोगस आदिवासी सेवेत लागणार नाही या दृष्टीने विभागाने काळजी घेणे आवश्यक आहे. असे समितीने विभागाच्या लक्षात आणून दिले. समितीच्या निदेशानंतरच उक्त कर्मचाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. विभागाने केलेल्या कारवाई बाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

समितीने दौऱ्याच्या वेळी वन विभागातील इतर संवर्गातील बिंदू नामावली सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून माहे डिसेंबर, २००९ नंतर केव्हा तपासण्यात आली आहे, त्यात मागासवर्ग कक्षाकडून कोणत्या त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत व त्याची पूर्तता कशाप्रकारे करण्यात आली याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, गोंदिया जिल्ह्यात वन विभागांतर्गत गट-क मध्ये वनसेवक, वनपाल, लिपिक व वाहन चालक असे एकूण ४ संवर्ग आहेत. यापैकी वनरक्षक व वनपाल यांची बिंदू नामावली तपासून झाली आहे. मेगा भरतीच्या अनुषंगाने वनरक्षकांची भरती प्रक्रिया सुरु केली आहे. लिपिक संवर्गाची एकूण ४२ पदे मंजूर आहेत. ४२ पदांपैकी ५० टक्के पदे सरळ सेवेने, ४० टक्के पदे गट-ड मधून पदोन्नतीने

आणि उर्वरित १० टक्के पदे वाहन चालकांमधून भरण्यात येत होती. उक्त टक्केवारीनुसार सरळ सेवेची ४० टक्के पदे भरली आहेत. गट-ड मधून पदोन्नतीने २ पदे भरावयाची आहेत. तसेच वाहन चालक ही पदे बाह्य यंत्रणेच्या माध्यमातून भरावयाची असल्यामुळे १० टक्के कोट्यातील ४ पदे रिक्त आहेत. १० टक्के कोट्यातून पदोन्नतीने भरावयाच्या दोन पदांची बिंदू नामावली तपासणीसाठी सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडे सादर केली आहे. त्यांच्याकडून तपासणी झाल्यानंतर पद भरती संदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. सन २००९ पर्यंत बिंदू नामावली मंजूर करण्यात आली होती. परंतु नंतरच्या कालावधीत भरती प्रक्रियेची कार्यवाही न झाल्यामुळे बिंदू नामावली प्रमाणित करुन घेण्यात थोडासा विलंब झाला. आता लिपिक संवर्गाची दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ पर्यंतची बिंदू नामावली प्रमाणित करुन घेण्यासाठी सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडे सादर केली आहे.

यानंतर सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, नागपूर यांनी स्पष्ट केले की, मागासवर्ग कक्षाने वन विभागाकडून प्राप्त झालेल्या वनरक्षक संवर्गाची बिंदू नामावली दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८ रोजी तपासून दिली आहे. तसेच दिनांक २१ डिसेंबर, २०१८ रोजी मेगाभरतीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली बिंदू नामावली तपासून दिली आहे. परंतु लिपिक संवर्गाची बिंदू नामावली तपासून देण्याबाबतचा प्रस्ताव अद्याप मागासवर्ग कक्षास प्राप्त झालेला नाही.

यासंदर्भात समितीच्या निदर्शनास आले की, वन विभागाने लिपिक संवर्गाची बिंदू नामावली संदर्भातील प्रस्ताव अद्याप सादर केलेला नाही. त्यावर समितीने सूचना केली की, दर तीन वर्षांनी नियमितपणे बिंदू नामावली तपासून घ्यावयास पाहिजे. परंतु सर्वसाधारणपणे ज्यावेळी पदे रिक्त असतात आणि त्या अनुषंगाने भरती प्रक्रिया राबवावयाची असते त्यापूर्वी बिंदू नामावली प्रमाणित करुन घेणे बंधनकारक असते. याबाबत उप वनसंरक्षक यांनी सांगितले की, दरम्यानच्या काळात पद भरती करण्याची वेळ न आल्यामुळे बिंदू नामावली तपासून घेण्यात आली नाही. दर तीन वर्षांनी बिंदू नामावली प्रमाणित करुन घ्यावयास पाहिजे. समितीने जिल्हा दौऱ्याच्यावेळी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने विभागाने अधिकाऱ्यांच्या चुकांवर आक्षेप घेण्याऐवजी त्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई करुन योग्य त्या सूचना द्याव्यात एवढेच समितीला अभिप्रेत होते. भविष्यात विभागाने वेळीच बिंदू नामावली नोंदवही तपासण्याचे काम करावे, जेणेकरुन अशा अडचणी उद्भवणार नाहीत. त्यामुळे विभागाने दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ पूर्वीच अहवाल सादर करावा असे निदेशित केले असता या कालावधीत समितीला कारवाईसह अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीला आश्वासित केले.

समितीने, आदिवासी विकास योजनेंतर्गत मागील तीन वर्षात आदिवासी उपयोजना व बाह्य योजना अंतर्गत किती निधी वन विभागास प्राप्त झाला, त्यातून कोणकोणती कामे हाती घेण्यात आली. रोजगार उपलब्ध करुन देण्याकरिता एखादी योजना राबिवली आहे काय अशी विचारणा केली असता उप वन संरक्षकांनी विदित केले की, सन २०१४- १५ मध्ये १ कोटी ७६ लाख रुपये मिळाले असून ती रक्कम पूर्णपणे खर्च झालेली आहे. सन २०१५-१६ मध्ये १ कोटी ६७ लाख रुपये मिळाले होते ती रक्कम देखील पूर्णपणे खर्च झालेली आहे. सन २०१६-१७ मध्ये २ कोटी ४८ लाख रुपये प्राप्त झाले असून पूर्ण रक्कम खर्च झाली आहे. वृक्ष लागवडीची योजना राबविण्यात आली होती. सन २०१४–१५ मध्ये ५५ हजार मनुष्य दिवस निर्माण करुन रोजगार उपलब्ध करुन दिलेला आहे. सन २०१४ ते २०१७ मध्ये वृक्ष लागवडीकरिता निधी प्राप्त झाला होता. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून इको टुरिझम अंतर्गत जवळपास ७८ लाख रुपये प्राप्त झाले. सालेकसा तालुक्यातील गावांमध्ये विविध सुविधा निर्माण करुन ४८ आदिवासी युवकांना प्रशिक्षण दिले असून त्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्हयाच्या ठिकाणी ४ लाख पर्यटक आले होते, या माध्यमातून ६० लाख रुपयांचे उत्पन्न प्राप्त झाले. मोहाची फुले गोळा करून प्रक्रिया केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सालेकसा व देवरी येथे मोहाच्या फुलांच्या माध्यमातून जास्त उत्पन्न प्राप्त झाले आहे. तसेच लाख प्रकिया केंद्र उभारण्याकरिता शासनाची मान्यता मिळाली आहे. यामुळे ६ हजार आदिवासी तरुणांना रोजगार मिळू शकेल. गॅस जोडणी दोन योजना आहेत. केंद्र शासनाची उज्वला योजना व राज्य शासनाची शामाप्रसाद मुखर्जी जन वन योजना. वनक्षेत्रात राहणाऱ्यांना ४ वर्षापर्यंत सन २०१२ पासून राज्य शासनाने ६ सिलेंडर दिले होते. आता या योजनेला चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे. बांबुकरिता राज्यात नवीन धोरण तयार केलेले आहे. बांबूचा वापर करुन जेवढे नवीन उद्योग तयार करता येतील तेवढे केले जाणार आहेत. बांबू पासून अगरबत्तीची काडी तयार केली जाते. यामुळे महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळतो. वन विभागात ११ वन वृत्त आहेत. प्रत्येक ठिकाणी एक समूह/गट तयार केलेले आहे. लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी बीआरटीसी चंद्रपूर येथे समूह सुरु केले आहे. बांबुची पाहणी करण्याकरिता त्रिपुरा व चीन येथे भेट दिली असता तिथे बांबुचा उपयोग केवळ क्राफ्टकरिता मर्यादित राहू नये. म्हणून त्याचा उपयोग उद्योग, बांधकाम तसेच फॅब्रिक तयार करण्याकरिता देखील होतो. बांबुकरिता त्रिपुरामध्ये ४५ दिवसांचा कोर्स आहे. महाराष्ट्रात देखील हा अभ्यासक्रम सुरु होत असून महाराष्ट्र राज्य पहिले राज्य आहे. बांबुकरिता दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम राज्यात सुरु होत असून दुसरी बॅच सुरु झाली आहे. अशा प्रकारे बांबुचे काम करणारे मनुष्यबळ

निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आता बांबु हा केवळ वन उत्पादन न राहिल्याने त्याचा वन शेती मध्ये वापर करता येईल. शेतकरी मोठ्या प्रमाणात बांबुची लागवड करु शकतात. बांबुची लागवड, कापणी व वाहतूक करण्यास शासनाच्या मंजुरीची आवश्यकता नाही. याकरिता बांबू बोर्ड स्थापन केलेले आहे. बांबूचे जाहिरात (प्रमोशन) करण्याकरिता कंपनी स्थापन केली आहे. मंडळ स्तरावर एकेक समूह तयार केले जाणार आहेत.

समितीने वन पट्ट्यांचे वाटप व हस्तांतरणाबाबत खुलासा करण्यास सांगितले असता अपर जिल्हाधिकाऱ्यांनी विदित केले की, आदिवासी चौकशी समितीकडे प्राप्त झालेले दावे ३ हजार ८८१ असून २ हजार ५७६ हेक्टर जमिनीचे वाटप झाले आहे. आदिवासींचे ९५ टक्के दावे मंजूर करण्यात आले आहेत मोजणी केल्यावर पट्टा अंतिम केला जातो, हस्तांतरणानंतर त्यांना सात-बारा, पट्टा दिला जातो. सुमारे २५७६ प्रकरणे मंजूर केलेले आहेत. मूळ सातबारामध्ये इतर मध्ये आदिवासींचे नाव लिहिले जाते. सन २००६ मधील वन हक्क कायद्यानुसार पात्र ठरणाऱ्यांना लागवडीचा अधिकार दिलेला आहे. मूळ मालक महाराष्ट्र शासन, वन विभागच राहणार आहे. ज्यांना पट्टा दिला जातो त्यांचे नाव इतर हक्कामध्ये राहणार आहे. या बाबत लोकांची मागणी आहे. की केंद्र शासनाच्या कायद्यामध्ये हा बदल करावा मात्र राज्य शासनाच्या अखत्यारीत ही बाब नाही.

राज्यातील वनपट्टे धारकांना शासनाची जमीन दिली जाते, त्यावेळी मूळ उताऱ्यामध्ये वन पट्ट्याधारकांचे नाव असावे इतर अधिकारामध्ये त्यांचे नाव असू नये अशी मागणी सातत्याने केली जात आहे. तसेच मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात खुलासा केला होता की, सातबारावर शेतकऱ्यांची नावे चढवली जातील. शेतकऱ्यांना शेतीकरिता जमीन दिलेली आहे. इतर अधिकारामध्ये धारकांचे नाव असल्याने शेतीकरिता त्यांना जे कर्ज घ्यावे लागते त्यासाठी बँकेकडे अर्ज केल्यास बँक कर्ज देत नाही. आदिवासींना जे वनपट्टे दिलेले आहेत ते वनक्षेत्रालगत आहेत आणि त्याठिकाणी विहिरींची कामे घ्यावयाची असल्यास वन विभागाकडून अडवणूक होते. या संदर्भात कोणते धोरण राबविले जाणार आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, आदिवासी बांधवांना शेती करण्यासाठी वनपट्टे दिलेले आहेत. तेव्हा त्यांना शेतीला पूरक अशा गोष्टी उपलब्ध असल्या पाहिजेत. वन विभागाकडून या संदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा केलेला आहे. केंद्र

सरकारकडून खुलासा प्राप्त झालेला आहे. वन विभाग आणि कृषी विभागांनी इतर विभागांच्या सहाय्याने प्रत्येक समूहावरील वनहक्कधारकांना सर्व योजनांचे लाभ, नियोजन करुन दिले पाहिजेत अशा सूचना केंद्र सरकारने दिलेल्या आहेत.

समितीने, अभयारण्यातील वाड्या, वस्त्या, पाड्यांचे विद्युतीकरण तसेच सौर ऊर्जेवर लाईट देणे याबाबतचे उपक्रम विभागाकडून राबविण्यात येतात काय असा प्रश्न केला असता क्षेत्र संचालकांनी विदित केले की, सन २०१५-२०१६ पासून आजपर्यंत १२० गावात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेंतर्गत जवळपास १९ कोटी रुपयांचे वाटप केलेले आहे. ग्रामसभेची मंजुरी घेऊन त्यांच्या स्तरावर सूक्ष्म आराखडा तयार करण्यात येतो आणि त्याप्रमाणे काम प्रस्तावित करण्यात येते. यामध्ये एलपीजी वाटप, एलपीजी रिफलिंग, दुधाळ जनावरे वाटप, विहिरींचे कठडे बांधकाम, सौर पथदिवे वाटप अशी कामे घेण्यात येतात. आजपर्यंत सुमारे १७७३ शेतकऱ्यांना सौर कुंपणाचे वाटप केलेले आहे. त्याशिवाय शौचालये बांधकामे, तलावाचे खोलीकरण, किचन ओटे बांधकाम, निर्धूर चूल वाटप, वळुंचे खच्चीकरणे आणि युवकांना स्वयंरोजगार प्रशिक्षण अशी कामे देण्यात येतात.

वन व्यवस्थापन समितीवर गावातील अध्यक्ष असतो आणि वनपाल किंवा वनरक्षक हे त्या समितीचे सचिव असतात. वन व्यवस्थापन समितीसाठी किती निधी खर्च झाला याची माहिती त्यांना मिळणे आवश्यक असते. आदिवासी विभागाकडून वन व्यवस्थापन समितीकडे मोठ्या प्रमाणात निधी वितरित करण्यात येतो पण खर्चाची आकडेवारी समितीला कुठेही मिळालेली नाही. वन व्यवस्थापन समितीला निधी मिळतो पण तो खर्च होत नाही. तो निधी दोन-चार वर्षे समितीच्या खात्यावर पडून राहतो. वन पट्टे धारकांनी सुरुवातीला १० सिलेंडर मिळतात नंतर ती संख्या कमी होऊन ६ सिलेंडर वर येतात. मागील पाच-सात वर्षापासून ही योजना सुरु आहे. त्या योजनेची रक्कम वन व्यवस्थापन समितीकडे देण्यात येते. लाभार्थी दोन-तीन वेळा सिलेंडर भरण्यासाठी येतो, नंतर तो वन व्यवस्थापन समितीकडे किंवा वन विभागाकडे देखील जात नाही. अशावेळी गॅस सिलेंडर रिफिलिंगचा निधी तसाच वन व्यवस्थापन समितीकडे पडून राहतो. ही अतिशय गंभीर बाब आहे. वन व्यवस्थापन समितीने प्राप्त झालेला निधी खर्च करावयास पाहिजे

तसेच शिल्लक राहिलेल्या निधीची माहिती देणे आवश्यक असून झालेल्या खर्चाचे लेखा परिक्षण झाले पाहिजे. तसेच राज्यातील सर्व वन व्यवस्थापन समितीच्या कामात सुधारणा करण्याबाबत सचिव पातळीवरुन निर्देश देण्यात यावेत व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीने सूचना केली.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) वन विभागामार्फत राबविण्यात येणारी उज्वला गॅस वाटप योजना प्रभावीपणे राबविण्यात येत नसल्याने लोक पुन्हा वृक्ष तोडीकडे वळत आहेत. सदर योजनेत लाभार्थ्यींना गॅसची टाकी रिकामी झाल्यावर पुन्हा भरण्याकरिता तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते व त्यांना वन व्यवस्थापन समितीकडून वेळेवर पैसे मिळत नाहीत. **गॅस पुरवठा योजनेतील उपरोक्त समस्यांवर तात्काळ उपाययोजना करण्यात याव्यात तसेच लाभार्थ्यांना त्यांच्या वाड्या/वस्त्यांवर गॅसची टाकी पुरवण्याची व्यवस्था करण्यात यावी व त्याचे पैसे वन व्यवस्थापन समितीकडून वेळेवर अदा करण्यात यावे. या प्रकरणी उप वनसंरक्षकांनी व्यक्तीशः लक्ष ठेवावे. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) आदिवासी विकास विभागाकडून वन विभागाला देण्यात येणारा निधी वन विभागाकडून वन्यजीव तसेच वृक्ष लागवड याकरिता मोठ्याप्रमाणात खर्च केला जातो. सदरहू कामाकरिता वन विभागाचा निधी खर्च होणे अपेक्षित आहे. **आदिवासी बांधवांना नियमित रोजगार उपलब्ध होईल अशी एकही योजना वन विभागाने राबविलेली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे रोजगार वाढविण्याच्या दृष्टीने तसेच पर्यटन विकासाच्या योजना किंवा इतर छोटया योजना राबवून तसेच ईको टुरिझम बाबतीत आदिवासींना प्रशिक्षण देऊन त्या माध्यमातून आदिवासी बांधवांना नियमित रोजगार उपलब्ध होईल, याबाबत उपाययोजना करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(३) गोंदिया वन विभाग कार्यालयाने लिपिक संवर्गाची बिंदू नामावली नोंदवही सन २००९ नंतर सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांचेकडून तपासून प्रमाणित केलेली नाही असे समितीच्या

निदर्शनास आले. शासन निर्णयानुसार दर तीन वर्षानी बिंदू नामावली तपासून प्रमाणीत करणे आवश्यक व बंधनकारक असतानाही बिंदू नामावली तपासून घेण्यात आली नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. **त्यामुळे सन २००९ पासून बिंदू नामावली प्रमाणित न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

(४) वन हक्क कायदयानुसार पात्र आदिवासी शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी वनपट्टे दिले जातात. शेती करिता त्यांना जे कर्ज घ्यावे लागते त्यासाठी बँकेकडे अर्ज केल्यास त्या आदिवासी शेतकऱ्यांना बँक कर्ज देत नाही. राज्यात आदिवासी शेतकऱ्यांना शेतीसाठी वनपट्टे दिले आहेत परंतु पट्टेधारक आदिवासी शेतकऱ्यांची नावे सात बाऱ्यावर नसल्याने बँकाकडून शेतीसाठी कर्ज मिळण्यास अडचणी येत आहेत. तसेच आदिवासींना जे वनपट्टे दिलेले आहेत तेथे शासनाच्या योजनेच्या माध्यमातून विहिरीचे व इतर आवश्यक कामे घ्यावयाची असल्यास वन विभागाकडून अडवणूक होते. **त्यामुळे या वनपट्टयांवर आदिवासी शेतकऱ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या योजनेच्या माध्यमातून मिळणारे सर्व योजनांचे लाभ देण्याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद

**वित्त विभाग :—**

वरिष्ठ सहायक लेखा व कनिष्ठ सहायक लेखा या संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रत्येकी एक पद रिक्त आहे. सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे अशी समितीने पृच्छा केली असता मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांनी विदित केले की, कनिष्ठ सहायक लेखा संवर्गातील अनुसूचित जमातीचे एक पद सरळसेवा भरतीसाठी दिनांक ३१ जानेवारी, २०१६ रोजी प्रमाणित केलेल्या बिंदुनामावलीनुसार रिक्त होते. परंतु महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक ५ मे, २०१६ नुसार "ड" वर्ग कर्मचाऱ्यांमधून "क" वर्ग कर्मचाऱ्यांची पदोन्नतीचे प्रमाण २५ टक्क्यावरुन ५० टक्के झाल्याने सदर संवर्गाची बिंदुनामावली दिनांक ३१ मे, २०१७ रोजीच्या स्थितीवर पडताळणीसाठी सादर करतेवेळी मंजूर पदे १५ दर्शविण्यात आली. परंतु सदर दिनांकात एकूण १७ कर्मचारी कार्यरत असल्याने २ पदे अतिरिक्त ठरलेली होती. त्यामुळे २ अतिरिक्त पदाचे समायोजन झाल्यानंतर सदर संवर्गाची बिंदूनामावली प्रमाणित करण्यासाठी सादर करण्याची सूचना दिलेल्या होत्या. कनिष्ठ सहायक लेखा संवर्गातील तीन वर्ष सेवा पूर्ण झालेले उमेदवार नसल्यामुळे वरिष्ठ सहायक लेखा पदाची पदोन्नती करता आलेली नाही.

**पंचायत विभाग :—**

ग्रामसेवक संवर्गातील सरळसेवेने भरावयाची २ पदे केव्हापासून रिक्त आहेत. तसेच रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे. तसेच रिक्त पद आंतर जिल्हा बदलीने भरण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विदित केले की, श्री. जी. एस. मानकर यांच्या मृत्यूमुळे दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ पासून एक पद रिक्त आहे. अनुसूचित जमातीचे १ पद आंतर जिल्हा बदलीने भरण्याबाबत प्रस्तावित केलेले आहे व १ पद सरळसेवा भरतीने भरण्याबाबत सन २०१७ मध्ये भरण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर सरळसेवा भरती शासन स्तरावर करण्यात येणार आहे. दोन्ही पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातील आहेत. सदर पदे भरण्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे. पुढील दोन ते तीन महिन्यांच्या आत अनुसूचित जमाती वर्गातील सर्व पदे भरण्यासंदर्भातील सर्व कार्यवाही पूर्ण करण्यात येईल आंतर जिल्हा बदलीने भरावयाच्या पदासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०१६ रोजी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

समितीने यावर, सदर ना हरकत प्रमाणपत्र देऊन एक वर्ष झाले तरी देखील यावर कोणतीही कार्यवाही का झाली नाही, जिल्ह्याचा कारभार सुरळीत चालण्यासाठी जिल्ह्यात पुरेसे ग्रामसेवक असणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील ग्रामसेवकाची पदे भरलेली नसतील तर शासकीय योजनांची अंमलबजावणी कशा प्रकारे होईल गेल्या एक वर्षापासून सदर पदे रिक्त असून एक वर्षात आपण किती वेळा पदे भरण्यासंदर्भात पाठपुरावा केलेला आहे. ज्या कर्मचाऱ्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेला कर्मचारी रुजू होत नसेल तर त्याचे ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करून दुसऱ्या इच्छुक कर्मचाऱ्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र पाठविण्यात यावी, असे समितीने निदेशित केले असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विदित केले की, सदर कर्मचाऱ्यांना नोटीस पाठवून हजर राहण्याचे आदेश देण्यात येतील व पदे तात्काळ भरली जातील.

पंचायत विभागातील ग्रामविकास अधिकारी १ पद रिक्त असून ते केव्हा भरण्यात येईल अशी समितीने विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विदित केले की, सदरहू पद दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी पदोन्नतीने रिक्त झाले आहे. उक्त पद पदोन्नतीने भरण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे परंतु शासनाने दिनांक २९ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयान्वये पदोन्नतीचे पद भरण्यास बंदी घातलेली असल्याने उक्त पद भरण्यात आले नाही. दिनांक १२ फेब्रुवारी २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गोंदिया जिल्ह्यातील ५ तालुक्यांमध्ये नगरपंचायत स्थापन झाल्यामुळे ग्रामविकास अधिकाऱ्यांची पदे कमी झालेली आहेत. नगरपंचायत स्थापन होण्यापूर्वी ग्रामविकास अधिकाऱ्यांची ६ पदे भरली होती. नगरपंचायत स्थापन झाल्यानंतर ग्रामविकास अधिकाऱ्यांचे १ पद कमी होऊन १ पद अतिरिक्त भरले गेले त्यामुळे अनुसूचित जमाती संवर्गातून उक्त पद भरण्यात आले नाही.

समितीने, जिल्हा परिषदेतील बिंदुनामावली तपासून घेण्याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी विदित केले की, सन १९९५ नंतर बिंदुनामावली तपासण्यात आली नाही. सन १९९५ पूर्वीच्या पद भरतींना संरक्षण आहे. मागासवर्गीय कक्षाच्या निकालानंतर सन १९९५ नंतरची बिंदू नामावली तात्काळ तपासण्यात येईल. सदर प्रकरण हे मागासवर्गीय कक्षाकडे प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे यापुढील कार्यवाही करण्यात येईल.

समितीने या मुद्याच्या अनुषंगाने सन १९९५ पूर्वीच्या बिंदूला संरक्षण असले तरी सदर शासन निर्णयामध्ये असे नमूद केले आहे की, जर एखाद्या व्यक्तीने अनुसूचित जमाती बिंदूवर नोकरी घेतली व तो जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकत नसेल तर अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळच्या बिंदूमध्ये समावेश करावा आणि संबंधित कर्मचाऱ्यांची अनुसूचित जमातीच्या बिंदूवरील नोकरी रद्द करावी. एक वर्ष झाले तरी संबंधित कर्मचाऱ्यांना सदर बिंदूतून रद्द करण्यात आले

नाही. सदर कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी न करता संबंधित कर्मचाऱ्यांना त्याच्या मूळ जातीच्या बिंदूमध्ये समाविष्ट करून अनुसूचित जमातीच्या बिंदूवर अनुसूचित जमातीतील उमेदवाराची नियुक्ती करावी. असे समितीने निर्देश दिले.

**आरोग्य विभाग :—**

आरोग्य विभागातील आरोग्य सेविकांची चार पदे, औषध निर्माण अधिकारी या संवर्गातील एक पद आणि आरोग्य सेवकांची सहा पदे केव्हापासून रिक्त आहेत व ती पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता माहे एप्रिल, २०१६ मध्ये काही कर्मचाऱ्यांच्या सेवा निवृत्तीमुळे सदर पदे रिक्त झालेली आहेत. सदर पदांच्या भरती संदर्भातील प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. सदरहू पदास मान्यता मिळाल्यानंतर ती सर्व पदे तात्काळ भरण्यात येतील असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील २ प्रकरणे जात पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सांगितले की, आरोग्य विभागामध्ये ५ कर्मचारी कार्यरत आहेत व त्यामधील २ कर्मचाऱ्यांची प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. १ उमेदवारास सेवेतून काढण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सन २०१५-१६ मध्ये उक्त उमेदवार रुजू झाला असून त्यास जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत दिली होती परंतु त्यांनी सादर केले नाही. सदरहू उमेदवार श्री. सुभेदार असून ते सन २०१५-१६ मध्ये रुजू झाले होते. त्यांचा जात पडताळणी प्रस्ताव लातूर येथील समितीकडे पाठविण्यात आला आहे. सदरहू उमेदवार भ.ज.(क) संवर्गातील आहे. आरोग्य विभागाने सन २०१५ मध्ये बिंदूनामावली नोंदवही तपासणीसाठी पाठविली होती. त्यावेळी शासन निर्णय दिनांक १८ मे, २०१३ व दिनांक ३० जुलै, २०१३ अन्वये कारवाई करून बिंदूनामावली मंजूरीस्तव फेरसादर करण्यात यावी, असे आदेश मागासवर्ग कक्ष नागपूर यांनी दिले होते. त्या अनुषंगाने सदरहू उमेदवाराचे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी पाठविण्यात आले आहे.

समितीने, अनुसूचित जमाती संवर्गातील आरोग्य सेविकांची एकूण २५ पदे आहेत. यातील सर्व कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिलेले आहे काय असा प्रश्न केला असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून समितीस अवगत करण्यात आले की, यातील काही कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास प्राप्त झालेले नाही. आरोग्य विभागातील ५ कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र प्रलंबित आहेत. त्यातील दोन प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत.

यावर समितीने, आपल्या कार्यालयातील २५ आरोग्य सेविकांच्या नियुक्तीच्या आदेशाची प्रत्येकी एक प्रत तसेच आपल्या कार्यालयातील किती कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र आलेली आहे व किती कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्र आलेली नाही यासंदर्भातील सर्व माहिती समितीस सादर करावी. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील ही बाब गंभीर असल्याचे दिसून येत नाही. जिल्ह्यातील सर्व विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांना स्वतःच्या विभागाची माहिती नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

समितीने, आदिवासी उप-योजना क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये किती डॉक्टरांची पदे रिक्त आहेत तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उप-केंद्रासाठी किती इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे, अशी विचारणा केली असता आरोग्य अधिकाऱ्यांनी विदित केले की, २५ एमबीबीएस डॉक्टरांची पदे रिक्त आहेत आणि गट ब मधील ६ पदे रिक्त आहेत. ४ नवीन इमारती प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मंजूर झालेल्या आहेत. या ४ इमारतींचे बांधकाम चालू आहे. या इमारती गोरे, ता. सालेकसा, पालांदूर, ता. देवरी, चिखली, ता. अर्जुनी आणि इळदा ही ४ ठिकाणे आहेत. यापैकी गोरे आणि इळदा येथील बांधकाम चालू असून इतर २ ठिकाणी निविदा प्रक्रिया चालू आहे. एका प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता ७ कोटी ५० लाख रुपये अपेक्षित असतो. त्यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या बांधकामासह अंतर्गत रस्ता, सुरक्षा भिंत ही कामे केली जातात. याकरिता निविदा काढून जवळपास ७ महिने झालेले आहेत. त्याचप्रमाणे एकूण १० नवीन उप-केंद्र मंजूर झालेले आहेत. यामध्ये ४ उप-केंद्रांची बांधकाम पूर्ण झालेली आहेत. औषधांची खरेदीच्या मागणीनुसार संचालक यांच्याकडे यादी पाठविली जाते. त्यामध्ये औषधांची संख्या व नावे समाविष्ट असतात. त्यांच्याकडून तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर औषधांची खरेदी केली जाते. सन २०१६-१७ मध्ये औषधांकरिता २० लाख ८० हजार रुपयांचा निधी प्राप्त झाला होता.

यावर समितीने, राज्य शासनाकडून आदिवासी विभागाला मुख्यतः आरोग्य विभागाला मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो. औषधांची खरेदी करून प्रत्येक आरोग्य केंद्राला पाठविले जाते. जिल्हा पातळीवर काही तातडीच्या औषधांच्या खरेदीसाठी राज्याच्या अर्थसंकल्पा मधील जिल्हा नियोजन समिती मधून अनुदानाच्या स्वरूपात निधी प्राप्त होतो. राज्य शासन तातडीची औषधे देत नसेल तर जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून तशी मागणी केली पाहिजे. डॉक्टरांची संख्या कमी असताना वाढीव औषधांची खरेदी का होते व कशा पद्धतीने होते ही बाब संशयास्पद आहे. आदिवासी उप-योजना व बाह्य योजना मध्ये डॉक्टरांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी आहे. अशी परिस्थिती असताना ते दवाखाने चालतात कसे, दवाखान्यामध्ये डॉक्टर कार्यरत नाहीत तेथे औषधांचा पुरवठा का केला जातो, अशा दवाखान्यांमध्ये रुग्णांवर कोण उपचार करतो याचा खुलासा सादर करण्यात यावा असे समितीने निर्देश दिले.

**शिक्षण विभाग :—**

समितीने केंद्र प्रमुख २ पदे, माध्यमिक शिक्षक ७ पदे अशी एकूण ९ पदे रिक्त आहेत. सदर पदे रिक्त राहण्याची काय कारणे आहेत व ही पदे केव्हा भरण्यात येतील अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकाऱ्यांनी विदित केले की, केंद्र प्रमुखांची भरती प्रक्रिया शासन स्तरावरून करण्यात येत असल्यामुळे सदरचे पद राहिलेले आहे. तसेच माध्यमिक शिक्षकांची पदे विभागीय परिक्षेद्वारे भरण्यात येणार असल्याने पदे रिक्त आहेत. समितीने बिंदू नामावली अद्ययावत करण्यात आली आहे काय, अशी विचारणा केली असता शिक्षण अधिकाऱ्यांनी विदित केले की, बिंदू नामावली तयार केलेली आहे २१ माध्यमिक शाळा आहेत. तेथील ५ ते १२ वी पर्यंतच्या शिक्षकांमध्ये ४ वेगवेगळे संवर्ग आहेत. त्यामध्ये त्यांची विभागणी करण्याकरिता थोडा वेळ लागला. बिंदू नामावली तयार केली असून माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये बिंदु नामावली तपासण्यासाठी सादर केली होती. त्याकरिता माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये तारीख मिळाली होती. परंतु काही कारणामुळे ते पूर्ण होऊ शकले नाही. सन २०१५-२०१६ मध्ये ५ वी ६ वी आणि ८ वी ९ वी पर्यंत अशाप्रकारे वेगवेगळ्या संच मान्यता असल्यामुळे वेगवेगळे बिंदूनामावली नोंदवही तयार करायची होती. इयत्ता ५ वी चे वेगळे आणि इयत्ता ६ वी ते ८ वी यांची वेगळी बिंदूनामावली नोंदवही तयार करावी लागल्याने त्यास विलंब झाला.

यावर समितीने, वैयक्तिक मान्यता, संच मान्यता यामुळे विलंब झाला हे खरे असले तरी वेळेत बिंदु नामावली तयार करून तपासण्यासाठी पाठविणे तुमचे काम आहे. परंतु तुम्ही यामध्ये दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. शिक्षक हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडवित असतात. शिक्षकांची पदे भरण्याकरिता, तसेच बिंदु नामावली तपासून घेण्याकरिता १५ महिने विलंब होत असेल तर ही अतिशय गंभीर बाब आहे.

समितीने, वाहन चालकांची २ पदे रिक्त असून या संवर्गातील बिंदु नामावली सन २०१० पासून अद्यावत नाही असे लक्षात आणून दिले असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नमूद केले की, दिनांक १ मे, १९९९ रोजी भंडारा जिल्ह्यातून गोंदिया जिल्हा वेगळा करण्यात आला. त्यानंतर या जिल्ह्यातील आस्थापनाचे मूळ आदेश आपल्याकडे नव्हते. यासंदर्भातील यादी बनविण्याचे काम मोठे होते. त्यामुळे त्यास विलंब झालेला आहे. सन २०१० मध्ये बिंदू नामावलीमध्ये त्रृटी काढण्यात आल्या होत्या. सदरहू त्रृटी आता दूर झाल्या असून आता पुढील तारीख मिळालेली आहे.

समितीने यानंतर सन १९९९ मध्ये गोंदिया जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर सन २०१० मध्ये बिंदूनामावली नोंदवही तपासून घेण्यात आली. आता सन २०१८ हे वर्ष सुरू आहे. नियमानुसार दर तीन वर्षांनी बिंदूनामावली न तपासल्यामुळे या पदावर येणाऱ्या उमेदवारांना २० वर्षांपासून डावलण्यात आलेले आहे. पर्यायाने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे. जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने बिंदूनामावली प्रकरणी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे.

मागील २० वर्षांमध्ये बिंदूनामावली तपासून पूर्ण केली किंवा नाही, हे पाहण्यासाठी समिती आली आहे. गोरगरीब आदिवासी बांधवांना शासनाकडून खूप अपेक्षा आहेत. शासनाच्या कल्याणकारी योजना प्रशासनाने राबविल्या तर राज्य प्रगत होईल. प्रशासकीय कामकाजामध्ये चुकीचे काम करणाऱ्यांना शिक्षा केली तर इतर अधिकारी व कर्मचारी त्याचा बोध घेऊन त्यांचे काम व्यवस्थित पार पाडतील. उक्त प्रकरणी एका पिढीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे उक्त प्रकरणी कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा.

**शिक्षण विभाग (प्राथमिक) :—**

समितीने, विस्तार अधिकारी (शिक्षण), कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक व माध्यमिक शिक्षक, ही पदे केव्हापासून रिक्त आहेत, ती भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता ग्रामविकास विभागाच्या दिनांक १० जून, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदावर पदोन्नती देण्याकरिता उमेदवाराने पदवी परिक्षेत ५० टक्के गुण प्राप्त केलेले असावे, प्रशासनाचा किंवा अध्यापनाचा ३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे. उक्त पात्रता धारण करणारा उमेदवार अनुसूचित जमाती संवर्गात नसल्याने सदरहू पदोन्नतीचे पद रिक्त असल्याचे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले.

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग :—**

समितीने, स्थापत्य अभियांत्रिकीचे १ पद केव्हा भरण्यात येणार आहे असा प्रश्न केला असता कार्यकारी अभियंता यांनी विदित केले की, स्थापत्य अभियांत्रिकीचे १ पद रिक्त असून अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र उमेदवार मिळत नसल्याने भरण्यात आले नाही. स्थापत्य अभियांत्रिकी सहायक या फिडींग संवर्गामधील ३ उमेदवारांमध्ये पदोन्नतीस पात्र उमेदवार नाही. उक्त पदोन्नतीसाठी ४५ वर्षे वय असेल किंवा व्यावसायिक परीक्षा पास असेल तर त्यास उक्त पदावर पदोन्नती देण्यात येते. उक्त पात्रता धारण केलेला उमेदवार नसल्याने पद रिक्त आहे.

**कृषि विभाग :—**

समितीने, कृषि विभागाच्या आदिवासी विकास योजना व उपयोजनेंतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात तालुकानिहाय कोण-कोणत्या योजना राबविण्यात आल्या आहेत व योजनेचे निकष काय आहेत असे विचारले असता कृषि अधिकाऱ्यांनी विदित केले की,आदिवासी विकास उपयोजनेंतर्गत ५० हजार रुपयांचे अनुदान १४ बाबींसाठी लाभार्थींना देण्यात येते. सदरहू योजनेचे स्वरूप सन २०१६-१७ पासून बदलले आहे. यावर्षी नवीन विहिरीसाठी १ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला होता. उक्त योजनेकरिता ३७ पात्र लाभार्थींची निवड करण्यात आली असून त्यांना तांत्रिक मंजुरी देण्यात आली आहे व कार्यारंभ आदेश देण्यात येणार आहे.

सन २०१४-१५ मध्ये १.३२ कोटी रुपये, सन २०१५-१६ मध्ये १.२५ कोटी रुपये व सन २०१६-१७ मध्ये १.२५ कोटी रुपये निधी प्राप्त झाला आहे. सन १९८२-८३ पासून वैयक्तिक लाभाच्या १४ बाबींवरील योजना राबविण्यात येतात सन २०१४-१५ मध्ये १०८ लाभार्थींना बैलजोडी देण्यात आली आहे. सन २०१५-१६ मध्ये एमआयडीसीतील संस्थेकडून साहित्य खरेदी करण्यात येत होते. तद्नंतर शासनाने डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजने संदर्भात शासन निर्णय निर्गमित केला त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

शेतकऱ्यांना डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर योजनेंतर्गत खुल्या बाजारातून अगोदर साहित्य खरेदी करावे लागते व त्यानंतर त्यांना अनुदान उपलब्ध करुन देण्यात येते. शेतकऱ्यांकडे पैसे नसल्याने ते खुल्या बाजारातून साहित्य खरेदी करु शकत नाहीत. त्यानंतर कृषी विभागाने शासन निर्णय निर्गमित केला की, जे शेतकरी खुल्या बाजारातून साहित्य खरेदी करु शकत नाहीत ते एमआयडीसीमधील संस्थेकडून साहित्य खरेदी करु शकतात. त्यानुसार खरेदी केलेल्या साहित्याचे बिल सादर केल्यानंतर कृषि विभागाकडून एमआयडीसीतील संस्थेला बिल अदा करण्यात येते.

यावर समितीने, कृषि विभागाच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या खरेदी संदर्भात प्रचंड तक्रारी समितीस प्राप्त झाल्या आहेत. त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गांभीर्याने नोंद घेऊन चौकशी करावी व समितीला अहवाल सादर करावा. कृषि अधिकारी लाभ मिळवण्यासाठी आलेल्या आदिवासी लाभार्थींना सौजन्याची वागणूक देत नाहीत, व्यवस्थित संवाद साधत नाहीत, त्रास देतात, अपमानित करतात, अशाही तक्रारी समितीला प्राप्त झाल्या आहेत. याबाबत संबंधित अधिकाऱ्यास समज द्यावी असे समितीने निर्देश दिले.

**लघुपाटबंधारे विभाग :—**

समितीने, सन २०१४-१५ ते २०१६-१७ मध्ये यंत्रणेस आदिवासी उपयोजना व बाह्य क्षेत्रासाठी एकूण किती निधी प्राप्त झालेला आहे, त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला व झालेल्या खर्चात कोणकोणत्या ठिकाणी साठवण बंधारा, लघुसिंचन तलाव, कोल्हापूरी बंधारे, दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. अपूर्ण कामांची सद्यःस्थितीबाबत विचारले असता कार्यकारी अभियंता यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली. सन २०१४-१५ मध्ये लघु पाटबंधाऱ्यांची एकूण ९५ कामे मंजूर झालेली आहेत. त्यापैकी २१ कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित ७४ कामे अपूर्ण अवस्थेत आहेत. सन २०१५-१६ मध्ये ८१ कामे मंजूर करण्यात आली होती, त्यापैकी ३४ कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच उर्वरित ४७ कामे अपूर्ण आहेत. अगोदरच्या वर्षी जी कामे पूर्ण झाली नाहीत अशी कामे पुढील वर्षी करण्यात येतात. काही कामांचा निधी उशिरा प्राप्त होतो. यामध्ये सन २०१४-१५ मध्ये एकूण २३ कोल्हापूरी बंधाऱ्यांची कामे केलेली आहेत.

**सार्वजनिक बांधकाम विभाग :—**

सार्वजनिक बांधकाम संदर्भात माहिती देताना कार्यकारी अभियंत्यानी नमूद केले की, सन २०१४-२०१५ मध्ये जिल्हा व इतर मार्ग (किमान गरजा कार्यक्रम) याकरिता आदिवासी उप-योजने मध्ये १८८.३३ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले होते. त्यात मागील शिल्लक ९८.१७ लाख रुपये होती. अशाप्रकारे या दोन्ही रकमा मिळून एकूण रक्कम २८६.४७ लाख रुपये होती. त्यामधील २३२.७४ लाख रुपये खर्च झालेले आहेत. यामध्ये भौतिक उद्दिष्ट ३५ होते व यापैकी २३ कामे पूर्ण झालेली आहेत. त्यात काही कामे मागील वर्षाची होती. या रकमेतून ५३.७६ लाख रुपये शिल्लक राहिले होते. तसेच १२ कामे अपूर्ण राहिली. सन २०१५-२०१६ मध्ये जिल्हा व इतर मार्ग याकरिता आदिवासी उप-योजनेमध्ये मागील ५३.७६ लाख रुपये शिल्लक होते. तसेच या वर्षामध्ये ११७.१४ लाख रुपये प्राप्त झाले होते. म्हणजेच ही रक्कम मिळून या वर्षीची एकूण रक्कम १७०.०९ लाख रुपये होती. त्यापैकी ९७.६९ लाख रुपये खर्च झाले व ७३.२१ लाख रुपये शिल्लक राहिले. या वर्षामध्ये २२ उद्दिष्टे आले होते आणि त्यापैकी १० कामे पूर्ण झालेली आहेत व १२ कामे अपूर्ण राहिलेली आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये जिल्हा व इतर मार्ग याकरिता आदिवासी उप-योजनेमध्ये गेल्या वर्षीची शिल्लक रक्कम ७३.२१ होती व प्राप्त अनुदान ८६.०६ होते. अशाप्रकारे ही एकूण रक्कम १५९.२७ झाली. त्यापैकी १२९.०३ लाख रुपये खर्च झाले व ३०.२५ लाख रुपये शिल्लक राहिले. या वर्षात १७ कामांचे उद्दिष्टे होते व त्यापैकी १५ कामे पूर्ण झाली व २ कामे अपूर्ण राहिलेली आहेत. यापैकी काही कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१४-२०१५ मध्ये ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेमध्ये ७५२.९८ लाख रुपये

अनुदान प्राप्त झाले होते. त्यापैकी ४७३.९७ लाख रुपये खर्च झाले व २७९.०१ लाख रुपये शिल्लक रक्कम राहिली. या वर्षामध्ये १०५ कामांचे उद्दिष्टे आले होते व त्यापैकी ४३ कामे पूर्ण झालेली आहेत व ६२ कामे अपूर्ण आहेत.

सन २०१५-२०१६ मध्ये ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेकरिता ५९८ लाख रुपये प्राप्त झाले होते व मागील वर्षीची शिल्लक रक्कम २७९ लाख रुपये होती. या दोन्ही रकमा मिळून या वर्षाची एकूण रक्कम ८७७ लाख रुपये झाली. या पैकी ५९७ लाख रुपये खर्च झाले. या वर्षी १५५ कामांचे उद्दिष्टे प्राप्त झाले होते आणि त्यापैकी ९५ कामे पूर्ण झाली आणि ६० कामे अपूर्ण राहिली आहेत.

सन २०१६-२०१७ मध्ये ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेकरिता १७१ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले होते. मागील वर्षीचे २८० लाख रुपये शिल्लक होते. त्यामुळे या दोन्ही रकमा मिळून या वर्षीची एकूण रक्कम ४५१ लाख रुपये झाली. या वर्षी ६० कामांचे उद्दिष्टे प्राप्त झाले होते व त्यापैकी ५३ कामे पूर्ण झाली व ७ कामे अपूर्ण राहिलेली आहेत. यातील ६ कामे इतर विभागाकडे वर्ग झाली असून १ काम ग्रामपंचायतीकडून उशिरा प्राप्त झाले. उशिरा प्राप्त झालेले काम सन २०१४-२०१५ मधील आहे.

यानंतर समितीने, शासनाकडून विविध योजनांकरिता प्राप्त झालेला निधी, त्या त्या योजनांवर त्याच वर्षामध्ये खर्च करण्यात यावा, जेणेकरुन लाभार्थी लाभापासून वंचित राहणार नाही. सर्व विभागांच्या विभाग प्रमुखांनी मेहनत घ्यावी व योजना चांगल्या प्रकारे राबवाव्यात. प्रत्येक अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी योग्य पद्धतीने पार पाडली तर गोंदिया जिल्हा व हा विभाग सुधारण्यास खुप मदत होईल असे समितीने मत व्यक्त केले.

जिल्हा परिषद कार्यालयामध्ये झालेल्या आढावा बैठकीच्या वेळी समितीने दिलेल्या सुचनांमार्फत कोणती कारवाई करण्यात आली असे समितीने विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी विदित केले की, सन २००१ नंतर अनुसूचित जमाती संवर्गात ३५६ कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. त्यापैकी ३४६ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यांचे जात वैधता प्रमाणपत्राची प्रत उपलब्ध आहेत. उर्वरीत १० कर्मचारी सन २०१२ नंतर सेवेत रुजू झाले आहेत. त्यामधील एका कर्मचाऱ्यास माननीय न्यायालयाने संरक्षण दिले आहे. त्यासंदर्भात यापुर्वीच्या बैठकीमध्ये माहिती दिली आहे. उक्त प्रकरणी माननीय न्यायालयाने दिलेल्या आदेशाची प्रत समितीस सादर करतो. उर्वरीत कर्मचारी यांचेपैकी एका कर्मचाऱ्यांची बदली गडचिरोली कार्यालयात झाली आहे. त्यामुळे त्याचे रेकॉर्ड उपलब्ध नाही. उर्वरित ८ कर्मचारी हे शिक्षक संवर्गातील असून त्यांना सन २०१४ मध्ये नियुक्ती देण्यात आली आहे.

यावर समितीने, कर्मचाऱ्यांची अनुसूचित जमाती संवर्गात नियुक्ती मिळाल्यानंतर लगेच त्यांची बदली झाली आहे काय ? असे विचारले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्या कर्मचाऱ्यांना सन २००३ मध्ये नियुक्ती देण्यात आली होती व सन २०१३ मध्ये त्यांची गडचिरोली येथे बदली झाली आहे. ८ शिक्षकांना ग्रामपंचायत स्तरावर नियुक्त केले होते त्यांना नियमानुसार १२ वर्षानंतर सन २०१४ मध्ये नियमित केलेले आहे. ८ शिक्षक कर्मचारी यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नसल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्यांच्यावर दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार एका आठवड्यामध्ये कारवाई करण्यात येईल व त्याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

**आरोग्य विभाग :**

समितीने ग्रामीण रुग्णालय चिचगड येथे भेट दिली असता वैद्यकीय अधिकारी यांची ४ पैकी २ पदे रिक्त आहेत, गायनॉकॉलॉजीस चे पद रिक्त आहे. काही वैद्यकीय अधिकारी प्रतिनियुक्तीवर असल्याचे निदर्शनास आले. एक्स-रे मशीन असून टेक्नीशिअनचे पद रिक्त असल्याने मशीन बंद ठेवण्यात आल्याचे आढळून आले. रुग्णालयात एकूण १६ पैकी १२ पदे रिक्त आढळून आली, रुग्णालयात सगळीकडे अस्वच्छता असल्याचे निदर्शनास आले. यावर जिल्हा शल्य चिकित्सक यांनी विदित केले की, चिचगड येथील रुग्णालयात एक्स-रे मशीन बंद आहे व एक्स-रे टेक्नीशियनची मागणी केलेली आहे. जेथे मशीन आहे तेथे चक्रानुक्रमाने नियुक्ती दिलेली आहे.

देवरी तालुका अतिदुर्गम आहे व १०० टक्के आदिवासी उप-योजनेचा तालुका आहे. या तालुक्यात रुग्णांना सेवा देण्यामध्ये विभागाचे दुर्लक्ष होत आहे. ग्रामीण भागातील लोक शासकीय रुग्णालयाकडे अपेक्षेने पाहत असतात. या रुग्णालयात मोठया प्रमाणात डिलीवरी रुग्ण येत असतात. तसेच विविध रोगातील शस्त्रक्रिया येथे होत असतात. अशा रुग्णालयात व्हेंटीलेटर उपलब्ध असणे आवश्यक आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी तसा प्रस्ताव दिला आहे का ? अशी समितीने विचारणा केली असता शल्य चिकित्सक यांनी व्हेंटीलेटरचा प्रस्ताव दिलेला नाही तसा प्रस्ताव तातडीने पाठविण्यात येईल असे नमूद केले.

या रुग्णालयास उप जिल्हा रुग्णालयाचा दर्जा दिल्यास आरोग्याच्या सुविधामध्ये वाढ होईल असे समितीने अभिप्राय दिले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ या कालावधीत गोंदिया जिल्ह्याचा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सदर दौऱ्यात समितीने, दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी गोंदिया जिल्हा परिषद कार्यालयास भेट देऊन बैठक घेतली होती. सदर बैठकीच्या अनुषंगाने दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी समितीने अनुसूचित

जमाती प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. सदर साक्षी दरम्यान समितीस जिल्हा परिषदेचा व विविध विभागांमध्ये अनुसूचित जमातीची रिक्त पदे आढळून आली आहेत. ग्रामसेवक संवर्गातील सरळसेवेतील दोन पदे भरण्याबाबत समितीने निदेश दिले होते. त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, जिल्हा परिषदेतील २० संवर्गामध्ये ग्रामसेवकांच्या पदांचा समावेश केलेला आहे. राज्यातील ३४ जिल्हा परिषदेमधील पदे भरण्याकरिता महाभरतीची प्रक्रिया सुरु केलेली आहे. सुमारे १३ हजार १७६ पदे असून यामध्ये अनुसूचित जमातीसह इतर सर्व प्रवर्गामधील २० संवर्गाचा समावेश केलेला आहे. पद भरतीस स्थगिती असल्यामुळे ही भरती प्रक्रिया थांबली होती. आता ३४ जिल्हा परिषदेतील सर्व संवर्गाची बिंदू नामावली अद्यावत झाली असून केवळ शिक्षक पदांची बिंदूनामावली नोंदवही अद्यावत झालेली नाही ती देखील आता लवकरच पूर्ण होणार आहे. जिल्हा परिषदेतील सर्व पदांचा समावेश मेगा भरतीमध्ये केलेला आहे. मेगा भरतीमध्ये जिल्हा परिषदेंतर्गत सर्व संवर्गाची तपासणी करून प्रमाणित झालेली आहे. जिल्हा परिषद, गोंदिया औषध निर्माण अधिकारी या संवर्गाची अंतिम तपासणी करून प्रमाणित दिनांक १४ डिसेंबर, २०१८ रोजी झालेले आहे. त्यापूर्वी दिनांक ३० नोव्हेंबर २०१८ रोजी तपासणी केली होती. आरोग्य सेविका प्रवर्गाची शेवटची बिंदूनामावली नोंदवही दिनांक १४, डिसेंबर २०१८ रोजी तपासली होती.

समितीने, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जिल्हा परिषद कार्यालयाची जात प्रमाणपत्र पडताळणीची किती प्रकरणे प्रलंबित आहेत ? असा प्रश्न केला असता, सहआयुक्त, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर यांनी विदित केले की, गोंदिया जिल्हा परिषदेची एकूण १२ प्रकरणे होती, त्यापैकी ११ प्रकरणे निकाली काढली आहेत. श्री.राजकुमार कावरे यांचे एक प्रकरण सन २००९ पासून सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्याबाबत एक महिन्यात कार्यवाही होईल. सदरचे प्रकरण पोलीस दक्षता पथकाकडे चौकशीसाठी होते. ग्रामविकास विभागात अनेक पदे रिक्त असल्याने कदाचित ते प्रकरण प्रलंबित राहिले असावे. आता चौकशी पूर्ण झालेली आहे आणि ते प्रकरण सुनावणी प्रक्रियेमध्ये आहे.

समितीने, गोंदियासारख्या अतिसंवेदनशील भागात वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त आहेत. त्याप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे काय ? अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सन २०१३-२०१४ मध्ये ११ पदांची भरती करण्याबाबत परवानगी मिळाली होती. आतापर्यंत ९ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली होती, त्यापैकी ७ जण रुजू झाले. वैद्यकीय अधिकाऱ्यांची एकूण ७८ पदे मंजूर असून त्यापैकी २७ पदे रिक्त असल्याचे समितीस अवगत केले.

**आरोग्य विभाग :—**

समितीने, आरोग्य विभागासाठी किती निधी प्राप्त झाला,त्यातून किती प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करण्यात आले आहे, तसेच किती आरोग्यदायी योजना राबविण्यात आल्या आहेत याची माहिती देण्यास सांगितले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, मागील वर्षी आदिवासी उप योजनेमध्ये तीन प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाली. या तिन्ही आरोग्य केंद्राची कामे सुरू झालेली आहेत. समितीने दौरा केला होता तेथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम ९० टक्के पूर्ण झालेले आहे. आतापर्यंत पावणेतीन कोटी रुपये खर्च झालेले आहेत. इडदा प्राथमिक आरोग्य केंद्राचे काम तीन-चार महिन्यात सुरू होईल. उर्वरित दोन प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी एका आरोग्य केंद्राचे काम सुरू असून, या वर्षापर्यंत आरोग्य केंद्रे सुरू होतील.

यावर समितीने, राज्यात मोठ्या प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अंतर्गत औषधांचा पुरवठा होतो आणि आदिवासी उप योजनेच्या काही संवेदनशील भागांमध्ये औषधांची कमतरता भासल्यास आदिवासी उप योजने कडून खरेदी करण्याची तरतूद आहे. परंतु, असे दिसून आले आहे की, वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे रिक्त असतानासुद्धा अत्यावश्यक सेवेसाठी देण्यात येणारा निधी पूर्ण खर्च होत आहे. ज्या प्रमाणात पैसे खर्च होत आहेत. त्याप्रमाणात आरोग्य सेवा दिली पाहिजे. यापूर्वी जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अतिसंवेदनशील भागात डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे अधिकार होते. आता थेट मुलाखतीचे अधिकार दिलेले आहेत. आरोग्य सेवा खंडीत पडता कामा नये हा उद्देश या मागचा आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याचे दिसून येते तर काही उप केंद्राची परिस्थिती आणखी वाईट आहे. तेथे कोणी कुलूप उघडण्यास देखील जात नाही. आरोग्यासाठी निधी खर्च झाला म्हणजे आरोग्य सुधारले असे होत नाही. तर लाभार्थ्याला अडचणीच्या वेळी मदत मिळाली पाहिजे अशी समितीची भावना आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभाग :—**

समितीने, सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सन २०१४-२०१५ मध्ये जिल्हा व इतर मागास वर्गास प्राप्त झालेल्या अनुदानासाठी ५३.७६ लक्ष रुपये शिल्लक राहिले होते. सन २०१५-२०१६ मध्ये आदिवासी उप योजनेअंतर्गत ७३.२१ लक्ष रुपये शिल्लक राहिले आणि १२ कामे अपूर्ण राहिली होती. सन २०१५-२०१७ मध्ये आदिवासी उप योजनेअंतर्गत ३०.२५ लक्ष रूपये शिल्लक राहिले आणि २ कामे अपूर्ण राहिली आहेत, असे समितीला अभ्यास दौऱ्याच्या वेळी निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने किती निधी खर्च केलेला आहे आणि किती कामे पूर्ण केलेली आहेत

याबाबत माहिती देण्यास सांगितले असता, याबाबत वर्षनिहाय आणि कामनिहाय समितीला यादी सादर केली जाईल, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी समितीस आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

(१) गोंदिया जिल्हा परिषदेतील कृषी विभाग, लघुपाटबंधारे विभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग या विभागातर्फे आदिवासी उपयोजने अंतर्गत प्राप्त निधीतून आदिवासींसाठी अनेक योजना राबाविण्यात येतात. यामध्ये सार्वजनिक योजनांबरोबर वैयक्तिक लाभार्थी योजनांचा समावेश असतो. त्यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे दरवर्षी निधीची तरतूद करण्यात येते. तथापि, हा निधी जिल्हा परिषदेच्या संबंधीत यंत्रणाकडून विहित कालावधीत खर्च करण्यात येत नाही. तसेच ठरविलेली उद्दीष्टे पूर्ण न करता तसाच ठेवला जातो. जिल्हा परिषदेस शासनाकडून प्राप्त निधी दोन वर्षांच्या कालावधीत खर्च करण्याची तरतूद असल्याने, सदर निधी दोन वर्ष खर्च न झाल्यास जिल्हा परिषदेस त्या निधीचे व्याज प्राप्त होते. ज्या उद्दिष्ठासाठी निधी वर्ग केलेला असतो, तो अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे खर्च होत नाही. बँकेत जमा असलेला निधी व त्यावर मिळणारे व्याज आदिवासींच्या विकासासाठी खर्च करण्यात यावे, तसेच जिल्हा परिषदेकडून करावयाची कामे विहित कालावधीत पूर्ण करून आदिवासी विकास विभागातर्फे पुरविलेला निधी वेळच्या वेळी खर्च होणे अत्यंत निकडीचे आहे. **शासनाकडून विविध योजनांकरिता प्राप्त झालेला निधी त्या-त्या योजनांवर त्याच वर्षामध्ये खर्च करण्यात यावा, आदिवासी विभागाच्या निधीचा विहित वेळेत वापर न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करावी व याबाबत जिल्ह्यातील प्रत्येक विभागाच्या विभाग प्रमुखांनी यावर लक्ष ठेवून योजना चांगल्या प्रकारे राबवाव्यात व याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

(२) सन १९९९ मध्ये गोंदिया जिल्हा अस्तित्वात आल्यानंतर सन २०१० पर्यत बिंदूनामावली नोंदवहीची सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून तपासणी करण्यात आले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. बिंदूनामावली विहित कालावधीत तपासणी न केल्यामुळे अनुसूचित जमातीचा अनुशेष मोठया प्रमाणात राहिलेला आहे त्यामुळे आदिवासी समाज वंचित राहिला आहे. **जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने बिंदूनामावली प्रकरणी अक्षम्य दुर्लक्ष केले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. या विलंबास जबाबदार असलेल्या संबांधित अधिकारी/कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३)** गोंदिया सारख्या अतिसंवेदनशील नक्षलग्रस्त व आदिवासी बहूल जिल्ह्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची २७ पदे व आरोग्य विभागातील इतर कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. तसेच आदिवासी उप योजना क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात प्राथमिक आरोग्य केंद्रे बंद असल्याचे व काही उप केंद्राची परिस्थिती खूप वाईट असल्याचे समितीला निदर्शनास आले. याचा जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर परिणाम झाला असून जिल्ह्यातील आदिवासी बहूल भागात आदिवासींना वेळेवर उपचार व आरोग्य सेवा व सुविधा मिळत नसल्याने त्यांचा प्रशासनाविरोधात रोष वाढत आहे. **अशा परिस्थितीत आदिवासी तरुणांना शासनाविरोधात चिथावण्यास व नक्षली चळवळी सक्रीय करण्यास नक्षलवादयांना वाव मिळतो. जिल्ह्यातील सदरहू परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करण्याकरिता शासनाने जिल्ह्यातील वैदयकीय अधिकाऱ्यांची व आरोग्य विभागातील इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरावीत. तसेच जिल्ह्यातील आरोग्य सेवा प्रभावीपणे पुरविण्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शासनास शिफारस करित आहे.**

(४) जिल्हा परिषदेतील शिक्षक संवर्गातील ८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती सन २०१४ मधील असून, त्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. त्यांच्यावर दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करून त्याचा अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आश्वासित केले होते. तथापि, अद्यापपर्यंत समितीस अहवाल सादर न करणाऱ्या व या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात यावी. तसेच **मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीचा निर्णय तसेच राज्य शासनाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार जात पडताळणी सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरिता अधिसंख्य पदावर नियुक्ती करुन अनुसूचित जमातीच्या पदांचा बिंदू रिक्त करण्यात यावा व त्या पदांवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करण्यात यावी. तसेच दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया अगोदर सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून जातपडताळणी प्रमाणपत्र घेण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरसुध्दा कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करित आहे.**

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी

**जात प्रमाणपत्र पडताळणी :—**

समितीने, विद्युत वितरण कार्यालयात अनुसूचित जमाती प्रवर्गातून सरळ सेवेने व पदोन्नतीने वर्ग ३ मध्ये एकूण १७ पदे व वर्ग ४ मध्ये एकूण ३५ पदे भरण्यात आलेली आहेत. ही पदे भरण्यापूर्वी संबंधित कर्मचाऱ्यांकडून जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय अशी विचारणा केली असता, अधीक्षक अभियंत्यांनी विदित केले की, वर्ग ३ व वर्ग ४ अशा एकूण ५२ कर्मचाऱ्यांपैकी ४८ कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेली आहेत. ४ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आलेले आहेत. श्री. वैभव दडमल यांचा प्रस्ताव दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी सादर केलेला आहे. श्री. रावतेल यांचा प्रस्ताव दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी सादर केलेला आहे. श्री. आनंदकुमार मंजूटे यांचा प्रस्ताव दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी सादर केलेला आहे आणि श्री. राजू सुलबुरवाड यांचा प्रस्ताव दिनांक २४ जून, २०१५ रोजी सादर केलेला आहे. सदरहू कर्मचारी सन २०१५ आणि सन २०१६ मधील आहेत. श्री. अशोक परतेके हे सन १९९५ पूर्वी रुजू झालेले आहेत. त्यांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

समितीने, यावर दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासननिर्णयानुसार श्री. रावते, श्री. मसराम, श्री. मंजूटे आणि श्री. सुलबुरवाड यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे. शासन निर्णयातील तरतुदीनुसार ६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. त्यानुसार एकाही विभागाने दिनांक १८ मे, २०१३ रोजीचे शासन निर्णय पालन केलेले नाही, राज्य विद्युत वितरण कंपनीने आतापर्यंत शासनाच्या निर्णयाची पायमल्ली केलेली आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या नियमाची देखील पायमल्ली केली आहे. श्री. अशोक परतेके यांचे प्रकरण सन १९९५ पूर्वीचे आहे. यांचाही बिंदू रिक्त केलेला नाही. तसेच दिनांक १८ मे २०१३ नंतर ज्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्यांच्यावर कारवाई करून अहवाल सादर करावा.

समितीने, आदिवासी उपयोजना क्षेत्रात व आदिवासी उपयोजना बाह्य क्षेत्रात विद्युत वितरण कंपनीकडून राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी गत तीन वर्षात एकूण किती निधी प्राप्त झालेला आहे? प्राप्त निधीतून कोणकोणत्या योजनावर किती निधी खर्च झालेला आहे व योजनानिहाय किती कामे पूर्ण झालेली आहेत. याची माहिती देण्यास सांगितले असता, अधीक्षक, अभियंत्यांनी विदित केले की, गोंदिया जिल्ह्यात सन २०१४-२०१५ मध्ये आदिवासी उपयोजनेंतर्गत २३१ लाख रुपये प्राप्त झाले होते व त्यातून १३० कृषी पंपांना विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. घरगुती विद्युत पुरवठा करण्यात आलेला आहे. त्याकरिता ३७ रोहीत्र उभारण्यात आलेले आहेत. तसेच १४.२३ किलोमीटर उच्च दाब वीज वाहिनी उभारणी करण्यात आलेली आहे. ३७.२५ किलोमीटर लघु दाब वीज वाहिनी उभारणी करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे २.४६ किलोमीटर कनव्हर्शन उभारणी करण्यात आलेली आहे. आदिवासी बाह्य उपयोजनेमध्ये मध्ये ६१.०८ लाख रुपये प्राप्त झाले होते. सदरहू सर्व निधी खर्च झालेला आहे.

सन २०१४-१५ या वर्षामध्ये ४७ कृषी पंपाचा पुरवठा करण्यात आला आहे. ६ रोहित्र बसविण्यात आले आहेत. ११ के.व्ही. लाईनची उभारणी केली आहे. आदिवासी उप योजना व बाह्य योजनेंतर्गत मंजूर निधी पूर्ण खर्च करण्यात आला आहे. अर्जुनी मोरगाव येथील एका पाड्यात सोलार पॅनल बसविण्याकरिता प्रस्ताव सादर केला आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी समितीने विचारणा केली की, श्री. वैभव दडमल, श्री. प्रवीण रावतेमल यांच्या जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणी कोणती कारवाई केली ते सद्यःस्थितीत समितीला अवगत केलेले नाही. यासंदर्भात समितीला माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी विदित केले की, श्री. वैभव दडमल, श्री. प्रवीण नरेंद्र रावतेल, श्री. आनंदकुमार, श्री. राजू मधुकरराव सुलबुरवाड व श्री. मनोज मसराम अशा प्रकारे एकूण ४ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. श्री. अशोक महादेव परतेके यांनी सद्यःस्थितीत आवश्यक ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यांना समितीचा अभ्यास दौरा संपल्यानंतर आपली सेवा समाप्त का करण्यात येऊ नये अशा प्रकारची कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. सदरहू कर्मचाऱ्याची नेमणूक अनुकंपा तत्वावर झालेली आहे. या कारणास्तव निर्णय घेण्यास विलंब झालेला आहे. या कर्मचाऱ्यांबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पूर्वी नियमानुसार निर्णय घेऊन पुढील कार्यवाही केली जाणार आहे. मा. न्यायालयाने अनुकंपाच्या प्रकरणांमध्ये कर्मचाऱ्यांना सेवेतून काढू नये असे आदेश दिलेले आहेत. म्हणून कारवाई करण्यास उशीर होत आहे. श्री. अशोक महादेव परतेके यांच्याबाबत माननीय न्यायालयाने आदेश दिलेला नाही. परंतु, सदरहू कर्मचाऱ्याची नेमणूक अनुकंपा तत्वावर झालेली आहे. श्री. अशोक महादेव परतेके, या कर्मचाऱ्याची नेमणूक सन १९९५ मध्ये झालेली आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत त्यांची २४ वर्षे शासकीय सेवा झालेली आहे. त्या कर्मचाऱ्याची नेमणूक अनुकंपा तत्वावर झालेली असल्यामुळे जात पडताळणी करण्याची आवश्यकता नाही.

समितीने, यावर, संबंधित कर्मचाऱ्याची नेमणूक सन १९९५ मध्ये झालेली असेल तर प्रश्नच येत नाही. त्यानुसार तो बिंदू रिक्त करावा. सद्यःस्थितीत बिंदू रिक्त का केलेला नाही. संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयानुसार बिंदू रिक्त करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे, असे निदेशित केले असता संबंधित कर्मचाऱ्याबाबत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पूर्वी नियमानुसार कार्यवाही केली जाणार आहे. असे सचिवांनी आश्वासित केले.

समितीने, मागील ३ वर्षात वितरण कंपनीला आदिवासी उपयोजना व उपयोजनाबाह्य क्षेत्रासाठी योजनानिहाय किती निधी प्राप्त झाला व त्यातून कोणती कामे घेण्यात आली आहेत ? याबाबत माहिती विचारली असता, विभागीय सचिवांनी विदित केले की, सन २०१४-१५ मध्ये आदिवासी उप योजने अंतर्गत २३१ लाख रुपये मंजूर झाले. त्यातून १२० कृषि पंप मंजूर झाले आहेत. सन २०१५-१६ मध्ये १५० लाख रुपये मंजूर झाले असून आदिवासी उपयोजने अंतर्गत ७४ कृषि पंप मंजूर

झाले. सन २०१६-१७ मध्ये १६६ लाख रुपये मंजूर झाले असून ८० कृषि पंप मंजूर झाले. सन २०१७-१८ मध्ये १ कोटी रुपये मंजूर झाले असून ३४ पंप मंजूर झाले. सन २०१४-१५ मध्ये ३७ रोहित्र उभारण्यात आले आहेत. उच्च दाब वीज वाहिनी १४.२३ किमी, लघु दाब वीज वाहिनी ३७ किमी. झालेली आहे. सन २०१५-१६ मध्ये डीटीसी २१ रोहित्र झाले असून उच्च दाब वीज वाहिनी ११.२५ किमी व लघु दाब वीज वाहिनी २३.८८ किमी झालेली आहे. सन २०१६-१७ मध्ये २२ डीटीसी झाले असून उच्च दाब वीज वाहिनी ८.७६ किमी, लघु दाब वीज वाहिनी २५.५८ किमी झालेली आहे. सन २०१७-१८ मध्ये ३४ कनेक्शन झाले, डीटीसी १२ झाले असून उच्च दाब वीज वाहिनी ७ किमी, लघु दाब वीज वाहिनी १२.१८ कि.मी आहे. ही कामे आदिवासी उपयोजने मधून झालेली आहेत यंत्रणा अद्यावत झालेली आहे. सन २०१४-१५ ते सन २०१७-१८ मध्ये एकूण ३१८ कनेक्शन झालेले आहे. साधारणपणे ९४२ लोड वाढला आहे. प्रत्येक वर्षी डीस्ट्रीब्युशन ट्रान्सफॉर्मर ॲड केलेले आहेत, दिनांक ३१ मार्च २०१८ पर्यंत जवळपास सव्वा दोन लाख पंप पेड अँड पेंडींग शिल्लक होते. विदर्भ व मराठवाड्याकरिता शासनाने अर्थसंकल्पामधून निधी उपलब्ध करून दिला आहे. उर्वरित महाराष्ट्राकरिता कर्ज काढून महावितरण काम करीत आहे. सोलार पंपची योजना शासनाने सुरू केली आहे. दिनांक ३१ मार्च, २०१८ नंतरच्या लाभार्थ्यांना सौर ऊर्जेचा पंप दिला जाईल. माहे मार्च, २०१८ पर्यंत ३६२ विद्युत पंप प्रलंबित होते त्याकरिता शासनाकडून ५१ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून कृषि पंपाना जोडणी दिली जाईल.

**अभिप्राय व शिफारशी :—**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कार्यालय, गोंदिया येथील चार कर्मचाऱ्यांची जात वैधता प्रमाणपत्राबाबतची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे बऱ्याच कालावधीपासून प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले होते. संबंधित कर्मचाऱ्यांवर याआधीच विभागाने दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई करणे अपेक्षित होते. दौऱ्याच्या वेळेस समितीने संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत निदेश दिले होते. **सदरहू निदेशाच्या अनुषंगाने समितीस अहवाल सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीचा निर्णय तसेच राज्य शासनाच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार जात पडताळणी सादर न केलेल्या कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांकरिता अधिसंख्य पदावर नियुक्ती करून अनुसूचित जमातीच्या पदांचा बिंदू रिक्त करण्यात यावा व त्या पदांवर अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती करण्यात यावी तसेच दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया अगोदर सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून जातपडताळणी प्रमाणपत्र घेण्यास विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरसुध्दा कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करित आहे.**

## एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी

अपर आयुक्त, नागपूर अंतर्गत येणाऱ्या देवरी प्रकल्प कार्यालयातील वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये एकूण मंजूर असलेल्या पदांपैकी अनुसूचित जमातीसाठी किती पदे रिक्त आहेत अशी समितीने विचारणा केली असता प्रकल्प अधिकाऱ्यांनी समितीस विदित केले की, गोंदिया जिल्ह्यातील प्रकल्प कार्यालय, देवरी येथे एकूण ५९ पदे रिक्त आहेत. तसेच अपर आयुक्त कार्यालय, नागपूर येथील सन २०१६-२०१७ या वर्षामध्ये कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी पदोन्नती १ पद वरिष्ठ लिपिक १ पद व लघु टंकलेखक १ पद तसेच माध्यमिक शिक्षकांची ४ पदे रिक्त आहेत. अशी एकूण ७ पदे रिक्त आहेत. शिक्षणामध्ये हलगर्जीपणा होऊ नये, याकरिता काही शिक्षकांची भरती मानधन तत्वावर केलेली आहे. सदर पदे ५ वर्षांपासून रिक्त आहेत.

यावर समितीने, कमी पटसंख्या असल्यामुळे काही शाळा बंद केल्याचे सांगितले जाते. शाळांमध्ये पटसंख्या कशी वाढेल व शिक्षकांची रिक्त पदे कशी भरली जातील, याबाबत गांभीर्यपूर्वक प्रयत्न केले पाहिजे. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये पाठविताना शाळांचा दर्जा तपासणे महत्वाचे असते. परंतु त्याबाबत पाहणी होत नाही. तसेच इमारती व खेळाचे मैदान न पाहता शिक्षकांना इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे याची तपासणी करण्यात यावी. नामांकित शाळांना विभागामार्फत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जातो. त्याचा विनियोग योग्य प्रकारे होतो काय हे विभागाने तपासणी करणे आवश्यक आहे. ही विभागाची जबाबदारी आहे. नाहीतर शाळा सुरू करायला आणि त्या बंद व्हायला, उशीर लागणार नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता उपायुक्तांनी विदित केले की, जेथे विद्यार्थी संख्या जास्त आहे, तेथे मानधन तत्वावर शिक्षकांची नेमणूक केलेली आहे. समितीच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरू झाल्या. त्यानंतर नामांकित आश्रम शाळांची चांगली योजना सुरू झाली. विभागाला दिलेल्या लक्षांकाप्रमाणे सर्व आश्रमशाळांमधील मुलांची परीक्षा घेऊन त्यांना नामांकित शाळांमध्ये पाठविले जाऊ लागले आहे. परंतु त्याचा परिणाम असा झाला की, इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या शाळा बंद पडू लागल्या. त्यामुळे तेथील शिक्षकांना भामरागड आणि इतर ठिकाणी पाठविण्यात आले. नियमामध्ये बसत नसल्यामुळे रिक्त पदांची भरती करता येऊ शकली नाही. शिक्षकांची रिक्त पदे दिसत असली तरी याचे मूळ कारण असे आहे की, विद्यार्थी दुसऱ्या शाळेमध्ये गेल्यामुळे आदिवासी आश्रम शाळा बंद पडू लागल्या, ही वस्तुस्थिती आहे. शिक्षकांचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने शिक्षक कक्ष, आयुक्तस्तरावर, प्रकल्पस्तरावर निर्णय केलेला आहे. त्यानुसार अपर आयुक्त आदिवासी विकास यांनी वेगवेगळ्या बैठका घेणे, प्रशिक्षण आयोजित करणे इत्यादी बाबी संदर्भात प्रकल्प अधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.

यानंतर समितीने, शिक्षकांचे समायोजन करण्याचे अधिकार अपर आयुक्त, आदिवासी विकास यांना असताना त्यांचे समायोजन का केले नाही ? विद्यार्थ्यांचा संबंध शिक्षकांशी आहे. विद्यार्थी शिकला तर त्यांचे भविष्य उज्वल होणार आहे. परंतु अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. शाळेची इमारत प्रशस्त असेल आणि वसतीगृह देखील प्रशस्त असली तरी शिक्षक नसेल तर विद्यार्थी काय शिक्षण घेणार आहे. ज्या ठिकाणी पट संख्या कमी आहे ती शाळा बंद करावी, असे राज्य शासनाने परिपत्रक काढले आहे. अशा प्रकारे शाळा बंद करून दुर्गम भागातील आदिवासी मुलांना शिक्षणापासून वंचित रहावे लागेल. १० टक्क्यापेक्षा कमी उपस्थिती असलेल्या शाळा बंद होण्याच्या स्थितीत आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळा १० टक्क्यापेक्षा कमी उपस्थिती असल्यामुळे बंद होण्याच्या स्थितीत आहेत. आदिवासी विकास विभागाकडे विद्यार्थी व शिक्षक उपलब्ध असताना तासिका तत्वावर शिक्षक नेमण्यात येतात. याबाबीकडे अपर आदिवासी, आयुक्त व प्रकल्प अधिकारी दुर्लक्ष करीत आहेत. प्रकल्प अधिकारी यांनी माहिती पाठविल्यानंतर त्यासंदर्भात आवश्यक बदल अपर आयुक्त आदिवासी विकास यांनी केला पाहिजे. सत्र सुरू होण्यापूर्वी ज्या आश्रमशाळेमध्ये विद्यार्थी संख्या विपुल आहे तेथे शिक्षक उपलब्ध करून न देता आदिवासी विद्यार्थ्यांचे नुकसान करीत आहात असे स्पष्ट मत समितीने मांडले.

समितीने, अधीक्षक, अधिक्षिका व चौकीदार यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात विचारले असता उपायुक्तांनी विदित केले की, चौकीदार, गृहपालाची ८ पदे रिक्त आहेत ती भरण्याची मंजुरी नसल्याने आयुक्त कार्यालयास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. उक्त पदे भरण्याबाबत मंजुरी मिळाल्यानंतर ती भरण्यात येतील. तसेच, अधीक्षक व अधिक्षिका यांची पदेही भरण्यात येतील. उक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार प्राथमिक शिक्षकांकडे देण्यात आला आहे.

आदिवासी विभागात सन २०१३-१४ ते सन २०१६-१७ या कालावधीत वर्ग-४ मधील कर्मचाऱ्यांची भरती केली नाही, त्याची कारणे काय आहेत, तसेच अनुकंपा तत्वावर घेण्याकरिता किती प्रस्ताव प्राप्त झाले, त्यापैकी किती उमेदवारांना सेवेत घेण्यात आले आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या कालावधीमध्ये वर्ग ४ कर्मचाऱ्यांची भरती केली नाही. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ व दिनांक २९ जून, २०१७ अन्वये आकृतीबंधानुसार वर्ग-४ मधील ४५ पदे निरसित करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यामधील ४३ पदे आश्रमशाळेतील व २ पदे वसतिगृहातील आहेत. वर्ग ४ करिता अनुकंपा तत्वावर १० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत व वर्ग ३ करिता ४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत, त्यांची भरती करण्यात आली नाही. समितीने, सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या कालावधीत प्रकल्प कार्यालयाने राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय किती

योजना राबविण्यात आल्या आहेत, आदिवासी उपयोजना क्षेत्रात किती रक्कम खर्च केली याबाबत सविस्तर माहिती देण्यास सांगितले असता प्रकल्प अधिकाऱ्यांनी नमूद केले की, जिल्हास्तरीय योजनेसाठी सन २०१४-१५ अखेर ३१.१३ कोटी रुपये मंजूर होते व अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे ३१.१० कोटी रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी २९.५१ कोटी रुपये खर्च झाले. केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सन २०१४-१५ करिता १.४५ कोटी रुपये सुधारित तरतूद करण्यात आली होती त्यापैकी १.२१ कोटी रुपये अर्थसंकल्प वितरण प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आली. उक्त योजनेतील अ गट उत्पन्न निर्मितीच्या ८५ टक्के अनुदानाच्या योजना पूर्ण झाल्या आहेत. याबाबत समितीने, केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतील लक्षांक व साध्य यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत आहे. विविध व्यवसाय योजनेसाठी ५० लक्षांक असताना ६ अर्जच कसे काय प्राप्त झाले अशी विचारणा केली.

केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजना सन २०१६-१७ मध्ये दारिद्र्य रेषेवरील आदिवासी शेतकऱ्यांना पाणी सिंचनाकरिता ८५ टक्के अनुदानावर उच्च घनत्व पॉलिएथिलीन पाईप (एच.डी.पी.ई) पुरवठा करण्यासाठी मंजूर योजना रुपये २० लाख आहे आणि ८५ टक्के शासकीय अनुदान रुपये १७ लाख प्राप्त झालेले असून विभागाने खर्च केलेला नाही असे समितीने लक्षात आणून दिले असता प्रकल्प अधिकाऱ्यांनी विदित केले की, उच्च घनत्व पॉलिएथिलीन पाईप (एच.डी.पी.ई) पुरवठा करण्याची जी योजना आहे ती योजना पीव्हीसी पाईप मध्ये वर्ग करण्यात आली आहे. तसेच संबंधित लाभार्थ्यांची यादी प्राप्त न झाल्यामुळे सदर योजनेवरील खर्च झालेला नाही. सन २०१४-१५ मध्ये १६५ ऑईल इंजिन मंजूर झाले होते. त्यासाठी ४० लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यातील सर्वच म्हणजे १६५ ऑईल इंजिनचे संबंधित लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले आहेत. सन २०१५-१६ मध्ये ३९.७७ लाख रुपये प्राप्त झाले होते. हा निधी अद्याप वाटप झालेला नाही. प्रकल्प अधिकाऱ्यांनी दिलेल्या वरील उत्तरावर समितीने, प्राप्त झालेला निधी दोन-दोन वर्ष पडून राहिल्यामुळे तो व्यपगत झालेला आहे. फक्त जिल्हा परिषद दोन वर्ष निधी आपल्या जवळ राखू शकते. बाकी सर्व विभागास एका वर्षाच्या आत सदर निधी खर्च करावा लागतो. आपण गेल्या दोन वर्षांपासून कोणत्याही प्रकारचा निधी खर्च केलेला नाही. प्रकल्प संचालक समितीने तीन-तीन वर्षे निधीचे संबंधित लाभार्थ्यांना वाटप केलेले नाही. प्रकल्प संचालक समितीने जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केलेले असल्याने या विषयाच्या संदर्भात समिती नापसंती व्यक्त करीत आहे.

समितीने दौऱ्याच्या वेळेस अनुदानित कचारगड आश्रम शाळा, पिंपरी, ता. सालेकसा येथे भेट दिली असता विद्यार्थ्यांची उपस्थिती ही ५० टक्क्यांपेक्षा कमी आढळून आली तसेच तेथील दहावीच्या वर्ग शिक्षक श्री. बोगचे यांना ११११/११ या गणिताच्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. त्यावेळेस

प्रकल्प अधिकारी देखील समिती सोबत होते. ही गंभीर बाब असून सदरहू आश्रम शाळेचे अनुदान थांबविण्यात यावे. तसेच संच मान्यता, शिक्षण मान्यता, बिंदु नामावली व इतर सर्व माहिती समितीला सादर करण्यात यावी. तसेच ह्या आश्रम शाळेवर विशेष लक्ष देण्यात यावे असे समितीने अभिप्राय दिले.

आदिवासी मुलीचे शासकीय वसतिगृह, पाल चौक, गोंदिया येथे समितीने भेटीदरम्यान पाहणी केली असता, वसतीगृहामध्ये १०७ मुली राहत असून दोन मुलींना झोपण्यासाठी एकच बेड असल्याची निदर्शनास आले. तसेच एका कक्षात सुमारे ३७ मुली राहत असून त्यांच्याकरिता केवळ २ स्वच्छतागृहे आहेत. वसतीगृहातील पंखे बंद अवस्थेत आढळून आले वसतीगृहामध्ये वार्डन नियमित उपस्थित राहत नाही. मुलींच्या वसतीगृहात पुरुष चौकीदार असून तो वसतीगृहामध्ये रात्रीच्या वेळी झोपतो मागील ४ वर्षांपासून वसतीगृहाची ही दुरवस्था आहे. या बाबी गंभीर असून याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली अनेक वर्षांपासून या वसतीगृहाच्या मुलींची गैरसोय होत असून या सर्व गैरसोयीस जबाबदार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करुन समितीस अहवाल सादर करावा असे निदेश दिले असता प्रकल्प अधिकारी यांनी आश्वासित केले की, संबंधित अधिकाऱ्यांवर एक महिन्याच्या आत कारवाई करून अहवाल समितीस सादर करण्यात येईल.

नामांकित शाळा किंवा विभागाच्या आश्रम शाळेमध्ये एखादी दुर्घटना घडल्यास आर्थिक सहाय्य केले पाहिजे होली क्रॉस कॉनव्हेंट, बुटी बोरी या नामांकित शाळेमध्ये एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता या बाबीला ४ महिने झालेले आहे .त्याला कोणतीही मदत अद्यापि मिळालेली नाही. असे समितीने पृच्छा केली असता, प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, कु. लक्ष्मी ही दिवाळीसाठी तीच्या घरी गेली होती. त्या दरम्यान तीचा मृत्यू झालेला आहे. सदर मुलीच्या कुटुंबियांना ७५ हजार रुपयांची मदत करण्यासंदर्भात विभागाने वरिष्ठ स्तरावर देखील प्रयत्न केलेले आहेत. शाळेच्या अनुदानातून सदर रक्कम कपात करण्यात यावी अशा सूचना दिलेल्या आहेत. सदर शाळेस अनुदान देण्याऐवजी ते अनुदान सदर मुलीच्या कुटुंबियांना देण्यात यावे, असा पत्र व्यवहार देखील करण्यात आलेला आहे यासंदर्भात तशी चर्चा देखील झालेली आहे. अशाप्रकारची मदत देण्यासंदर्भात नामाकिंत शाळांना कोणतीही सूचना नव्हती त्यामुळे मदत दिली नव्हती. सदर घटनेनंतर मदत करण्यासंदर्भात सूचना प्राप्त झाल्या नंतर पुढील कार्यवाही सुरू झाली. सदर मदत ही संबंधित शाळेस देण्यात येणाऱ्या अनुदानातून दिली जावी, अशी सूचना आहे.

जिल्हा परिषद आणि आदिवासी आश्रम शाळा या पटसंख्ये अभावी बंद पडत आहेत आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना नामाकिंत शाळेत पाठविण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. ज्या वेळी अशाप्रकारचे धोरण निश्चित करण्यात येत होते त्यावेळी जी सखोल चर्चा होणे आवश्यक

होती ती चर्चा दुर्दैवाने झालेली नाही. एखाद्या आश्रम शाळेतील विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत मदत जाहीर केली जात होती. मृत्यू झालेल्या कुटुंबियांना अल्पशी का होईना तात्काळ मदत दिली जात होती नामांकित शाळेस प्रति विद्यार्थ्यास प्रति वर्षी ७० हजारांचे अनुदान दिले जाते. जर एखाद्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर त्या विद्यार्थ्याचे ७० हजार रुपये शाळेस दिले जाते. अशा विद्यार्थ्यांना मदत देण्याची वेळ येते तेव्हा प्रकल्प अधिकारी हे दुर्लक्ष करतात अशा विद्यार्थ्यास मदत करण्याची वेळ येते तेव्हा अनेक कारणे दिली जातात. संबंधित विद्यार्थीनी सुट्टीत घरी गेल्या त्या नंतर त्याचा मृत्यू झाला अशी अनेक कारणे दिली जातात. या संदर्भातील योग्य ती नियमावली तयार केली पाहिजे त्या अनुषगांने एखादी दुर्घटना घडली असेल तर संबंधित नामांकित शाळेने पुढील कार्यवाही केली पाहिजे आदिवासी आश्रम शाळा व नामांकित शाळेसंदर्भात तात्काळ धोरण निश्चित करण्यात यावे, अशी सूचना समितीने केली.

जे विद्यार्थी नामांकित शाळेकडे वर्ग केले जातात, अशा विद्यार्थ्यांचे पालकत्व कोणाकडे असते असे समितीने विचारले असता उप आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांनी विद्यार्थ्याचे पालकत्व आदिवासी विभागाकडे असते असे नमूद केले.

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. यासाठी आदिवासी विभाग संबंधित विद्यार्थ्यांचे पालकत्व घेते. अशाप्रकारच्या दुर्घटना घडल्यानंतर मदतीची मागणी नामांकित शाळेकडे का केली जाते? आदिवासी विभागाने संबंधित विद्यार्थ्यांस तातडीने मदत का देत नाही, भविष्यामध्ये अशाप्रकारच्या घटनाच घडणार नाहीत, अशी उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीने अभिप्राय दिले असता उप आयुक्त आदिवासी विकास यांनी विदित केले की, सानुग्रह अनुदानाच्या बाबतीत एक कॉमन विषय होता तो असा की, प्रति विद्यार्थी प्रति वर्ष ७५ हजार रुपयांचे अनुदान संबंधित नामांकित शाळांना दिले जाते. समितीने सांगितल्याप्रमाणे स्पेसिफिक धोरणाची आवश्यकता आहे. मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुंटुंबियांना शाळेच्या अनुदानातून मदत देण्यात यावी, अशाप्रकारचे परिपत्रक आदिवासी विभागाने काढलेले आहे. संबंधित विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना अद्याप मदत मिळालेली नाही. असे समितीने लक्षात आणून दिले असता प्रकल्प अधिकारी यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या कुटुंबियांना लवकरात लवकर मदत देण्यात येईल, असे स्पष्ट केले.

आदिवासी आश्रम शाळा व नामांकित शाळेमध्ये अधिकारी भेदभाव करीत आहेत. आदिवासी आश्रम शाळेसाठी वेगळे नियम व नामांकित शाळेसाठी वेगळे नियम यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यामध्ये अधिकारी मोठ्या प्रमाणावर भेदभाव करीत आहेत असा समितीचा स्पष्ट आरोप आहे. दोन्ही शाळेतील विद्यार्थ्यांचे पालकत्व विभागाकडे आहे तर

दोन्ही विद्यार्थ्यास वेगवेगळे नियम व निकष कशासाठी? या संदर्भात विशेष नोंद घेऊन संबंधित विद्यार्थ्याच्या कुंटुंबियांना तातडीने मदत करण्यात यावी. सदर मदतीचा अहवाल समितीस सादर करावा. असे समितीने निदेश दिले.

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, इळदा, ता. अर्जुनी मोरगाव येथे समितीने भेट दिली असता, आश्रमशाळेत इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतची पटसंख्या अतिशय कमी आढळून आली ८६ विद्यार्थ्यांचे पैसे डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर (डीबीटी) द्वारे वर्ग झालेले नाहीत तसेच अनेक विद्यार्थ्यांचे डीबीटी केलेली नाही. विद्यार्थ्यांना झोपण्यासाठी बेडची संख्या अतिशय कमी आहे सोलर पंप १ वर्षापासून बंद आहे स्वयंपाक घरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता असून एक्झॉस्ट पंखा लावण्याची आवश्यकता असल्याचे निदर्शनास आले. कोठी गृहामध्ये जेवणाचे साहित्य जमिनीवरच फळी टाकून ठेवलेले आढळून आले.

तसेच या आश्रम शाळेस सनविंग कॉम्प्युटर्स या संस्थेस विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे कंत्राट देण्यात आले असून सदरहू संस्थेने संगणक आश्रम शाळेस दिलेले नाहीत शाळेतील जुन्या ४ संगणकाद्वारे प्रशिक्षण दिले जात असल्याचे निदर्शनास आले काही विद्यार्थ्यांना संगणक हाताळता आले नाही. व काही संगणकास माऊस नव्हते व संगणकावर प्रचंड धूळ साचली असल्याचे समितीस आढळून आले.

यावर समितीने, वर्षानुवर्ष अशा संस्था काम करित आहे त्यांच्यावर कोणत्याही अधिकाऱ्यांचे नियंत्रण नाही. प्रकल्प अधिकाऱ्यांनी किती वेळा आश्रम शाळेस भेटी दिल्या अशी विचारणा केली असता प्रकल्प अधिकारी यांनी विदित केले की, सहायक प्रकल्प अधिकारी, कनिष्ठ शिक्षण अधिकारी यांनी प्रति महिन्यास सर्व शाळांना भेट देण्याची तरतूद आहे. सदर तरतुदीची अंमलबजावणी देखील केली जाते.

अधिकारी भेटी देऊन देखील त्या आश्रम शाळांमध्ये सुधारणा होत नाही. अतिशय निकृष्ट दर्जाचे साहित्य या आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात आली आहेत या आश्रमशाळेच्या दुरावस्थेस जबाबदार संबंधित अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच सनविंग कॉम्प्युटर संस्थेची मान्यता रद्द करण्यात यावी असे समितीने निदेश दिले. यावर प्रकल्प अधिकारी यांनी संबंधित संस्थेची मान्यता तात्काळ रद्द करण्यात येईल असे आश्वासित केले.

समितीने, स्वामी विवेकानंद पोस्ट बेसिक आश्रम शाळा पवणी, ता. अर्जुनी मोरगाव या शाळेस प्रकल्प अधिकाऱ्यांनी केव्हा भेट दिली असे विचारणा केली असता, प्रकल्प अधिकारी यांनी काही दिवसापूर्वी शाळेस भेट दिल्याचे नमूद केले. समितीने आश्रम शाळेची पाहणी केली असता, तिथे

मोठ्या प्रमाणात अस्वच्छता होती. तेथील विद्यार्थी हे उघड्या जागेवर आंघोळ करत असल्याचे निदर्शनास आले तेथील विद्यार्थ्यांना बसण्याची व झोपण्यासाठी देखील सोय नाही. या आश्रम शाळेत विद्यार्थ्यांना अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याचे निदर्शनास आले. तूरडाळ, वाटाणा, मटकी, मूग, सोयाबिन, चणे अतिशय निकृष्ट दर्जाचे असल्याचे आढळून आल्याने पुरवठा विभागाकडून त्याचे पंचनामे करण्यात आले. मुलींच्या वसतीगृहातील गाद्या व ब्लँकेट अतिशय खराब, मळकट व काही गाद्यांवर ब्लँकेट नसल्याचे आढळून आले. मुलींच्या वसतीगृहात फरशी बसवली नव्हती तसेच त्यांचे साहित्य ठेवण्यासाठी कपाटे दिलेली नव्हती. शौचालयाचे दरवाजे तूटलेले असून शौचालय अस्वच्छ होते या वसतीगृहाची अवस्था अत्यंत बिकट दिसून आली.

यावर प्रकल्प अधिकाऱ्यांनी या संदर्भात सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करतो असे आश्वासित केले समितीने कोणती कारवाई करणार असे विचारले असता प्रकल्प अधिकाऱ्यांनी विदित केले की, संबंधित शाळेचे अनुदान थांबविण्याचा प्रस्ताव शासनाकडे तात्काळ सादर करण्यात येईल व संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून योग्य ती कारवाई केली जाईल. कारवाईचा अहवाल एक महिन्यांच्या आत समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.

समितीने लिटील फ्लॉवर स्कूल ॲण्ड जुनिअर कॉलेज गोंदिया या शाळेस भेट दिली. त्या शाळेस अपर आयुक्त आदिवासी विकास यांनी भेट दिली असता त्यांनी त्या शाळेस ८३ गुण दिले आहेत. नामांकित शाळेची तपासणी करीत असतांना प्रामुख्याने ५ बाबींकडे जास्त लक्ष दिले पाहिजे. शाळेची इमारत, शिक्षणाची व्यवस्था, विद्यार्थ्यांस खेळाचे मैदान, वसतीगृह, पाणी आणि जेवणाची व्यवस्था या सर्व बाबींची कसून तपासणी करण्याची आवश्यकता असते. त्या ठिकाणी समितीस यातील एकही बाब समाधानकारक दिसून आली नाही. त्या शाळेस कोणत्या नियमानुसार ८३ गुण देण्यात आले आहेत. त्या शाळेत एकाच बेडवर ४ मुले झोपत आहेत, विद्यार्थ्यांना खेळण्यास शाळेचे मैदान नाही, बांधकामासाठी इमारतीची एक भिंत पाडलेली आहे. त्यातील आडवा भिम तसाच लटकलेल्या अवस्थेत आहे. सदर शाळेतील वसतीगृहातील स्वयंपाक गॅस स्टोव्हवर करण्यात येत असल्याचे आढळून आले. इयत्ता पहिली ते चौथी मधील विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप केलेले नाहीत. शाळेचे स्ट्रक्चरल ऑडीट केले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले याबाबत समितीने प्रकल्प अधिकारी यांना याची चौकशी करून समितीस अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

समितीने दिनांक १८ ते २० जानेवारी, २०१८ या कालावधीत अभ्यास दौरा आयोजित केला होता, त्यावेळी आश्रमशाळांमध्ये प्राथमिक शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी सूचना केलेली होती. तासिका तत्वावर शिक्षकांची भरती केली जात होती. त्यामुळे ज्या विषयांच्या शिक्षकांची आवश्यकता

होती, ते शिक्षक नव्हते, असे समितीला अभ्यास दौऱ्याच्या वेळी निदर्शनास आले होते. ज्या विषयांच्या शिक्षकांची आवश्यकता आहे, असेच शिक्षक भरण्यासाठी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यास सांगितले असता अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग यांनी विदित केले की, शिक्षक संवर्गाची विभागीय स्तरावर एकूण १०० पदे रिक्त आहेत. प्राथमिक शिक्षकांच्या १ हजार पदांपैकी २७४ पदे रिक्त आहेत. त्यापैकी २१४ पदे ही शाळा बंद असल्यामुळे भरता येत नाहीत व ५९ पदे ही पटसंख्या कमी असल्यामुळे भरता येत नाहीत. माध्यमिक शिक्षकांची ६८ पदे रिक्त आहेत. त्यापैकी २३ पदे ही शाळा बंद असल्यामुळे भरता येत नाही. पेसा क्षेत्रातील पदे भरण्यासाठी शासनाने सन २०१८ मध्ये १०० टक्के पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली आहे. पदे भरण्यासाठी वित्त विभागाची आता कोणतीही अडचण नाही. पेसा क्षेत्रातील पदे भरण्यासाठी माहे डिसेंबर, २०१८ मध्ये जाहीरात दिलेली आहे. ही भरती प्रक्रिया माहे फेब्रुवारी, २०१९ पर्यंत पूर्ण केली जाणार आहे.

अनुदानित आश्रमशाळांची बिंदू नामावली प्रमाणित करून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे असे समितीने विचारले असता अपर आयुक्त नागपूर यांनी सर्व प्रकल्प अधिकारी कार्यालयांना पत्रे दिली होती. सदरहू पत्रामध्ये बिंदू मान्यता झाल्याशिवाय कोणत्याही शाळांना पुढील पदे भरण्यासाठी मान्यता मिळणार नाही तसेच इतर विहित देय देखील दिले जाणार नाही असे सांगितले होते.

यावर समितीने अपर आयुक्त नागपूर, यांच्या कार्यक्षेत्रातील कोकणा संस्थेची सडक अर्जुनी येथे अनुदानित आदिवासी आश्रमशाळा आहे. त्या ठिकाणी एक महाविद्यालय, डीएड विद्यालय सुरू आहे. त्या भागात एकापेक्षा अधिक शैक्षणिक शाखा सुरू असून त्याठिकाणाहून अनेक तक्रारी आलेल्या आहेत त्यामुळे त्यासंदभातील चौकशी करून समितीला ८ दिवसांच्या आत अहवाल सादर करावा, अशी सूचना केली.

समितीने, देवरी प्रकल्प कार्यालयांतर्गत येत असलेल्या अनेक आश्रमशाळा मागील ३ वर्षांपासून बंद आहेत. या आश्रमशाळा सुरू करण्याकरिता कोणतेही प्रयत्न न करता आश्रमशाळेतील विद्यार्थी नामांकित शाळेत पाठविण्यात आले. नामांकित शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना इतर मुलांसोबत बसवले जात नव्हते, असे समितीला आढळून आले. यामध्ये लिटील फ्लॉवर्स शाळेचा समावेश होता. लिटील फ्लॉवर्स या शाळेला देण्यात आलेल्या मुल्यांकनाबाबत खुलासा करण्यास सांगितले असता अपर आयुक्तांनी नमूद केले की, सन २०१६ मध्ये या नामांकित शाळेचा पहिल्यांदा अर्ज आला. माहे जुलै, २०१६ मध्ये त्यावर अभिप्राय देण्यात आला. त्या आधारे सन २०१६-१७ करिता ५० विद्यार्थी देण्यात आले. सन २०१७ पासून मुल्यांकनाची पद्धत सुरू झाली.

अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांनी मुल्यांकन करून ६३ गुण दिले होते. सन २०१७ मध्ये आणखी ५० विद्यार्थी देण्याची शिफारस करण्यात आली. समितीचा दौरा तेथे गेला त्यावेळी ही प्रक्रिया सुरू होती. त्यामुळे ३७ विद्यार्थ्यांचा प्रवेश झाला होता. या नंतर शाळेला दिलेल्या मान्यतेला स्थगिती देण्यात आली. त्यानंतर उर्वरित विद्यार्थ्यांना या शाळेत प्रवेश दिलेला नाही. सध्या एकूण ८७ विद्यार्थ्यी या शाळेत आहेत येथील बेडची संख्या कमी असून तेथे जास्त विद्यार्थी असल्याचे समितीला आढळून आले होते. त्यानुसार तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्यांकडून शाळेचे निरीक्षण करण्यात आले होते. आता विद्यार्थ्यांच्या बेडची संख्या वाढवली असून त्यामध्ये सुधारणा झालेली आहे. नामांकित शाळा म्हटल्यावर जो दर्जा अपेक्षित असतो तसा नसून त्यामध्ये सुधारणा करण्यास वाव आहे. या मुद्या संदर्भात प्रधान सचिवांनी समितीस अधिक माहिती देताना सांगितले की, सन २०१८-१९ मध्ये या शाळेला मान्यता दिलेली नाही. शासकीय व अनुदानित आश्रमशाळेचा आढावा घेत आहेत. जुन्या मान्य केलेल्या शाळांची फेर तपासणी केली जाणार आहे. यंदा या शाळेला एकही विद्यार्थी दिलेला नाही. आवश्यक दर्जा नसल्यास कोठेही गुणवत्तेबाबतची तडजोड केली जाणार नाही.

भाड्याच्या इमारतीबाबत प्रधान सचिवांनी नमूद केले की, भाड्याने इमारत घेऊ नका अशी सूचना दिलेली नाही. या उलट सर्व क्षेत्रीय कार्यालयांना असे सांगितले आहे की, भाड्याची इमारत असल्यास सखोल तपासणी करावी. मालक सुविधा उपलब्ध करून देत नसल्यास त्यांना नोटीस काढा व भाडे बंद करा, त्याचप्रमाणे दुरुस्तीचा खर्च भाड्याच्या रकमेतून करावा अशा सक्त सूचना सुरूवातीपासून प्रत्येक प्रकल्प अधिकारी यांच्या सोबत दिल्या आहेत. भाड्याची इमारत घेऊ नका असे कोठेही सांगितले नाही. आता राज्यात अशी कार्यवाही करण्यात आली आहे की, प्रत्येक वसतीगृह व आश्रमशाळा येथे साधारणपणे ४०० जणांचे १२५ पथक तयार केले आहे. मंत्रालयातील अधिकारी, अपर आयुक्त आदिवासी विकास, प्रकल्प अधिकारी यांची टिम तयार करून माहे डिसेंबर, २०१८ मध्ये १५ दिवसांकरिता प्रत्येक शाळेत व वसतीगृहाला भेट दिली होती. प्रत्येक शाळेत किती सुविधा आहेत. मुलांना सामान ठेवण्यासाठी फर्निचर, बेड व इतर सुविधा आहेत काय, यांची पाहणी करून डेटा तयार केलेला आहे. ही माहिती संकलित करून पोर्टलवर दिलेली आहे. मात्र ज्या ठिकाणी इमारत चांगली नाही व भाड्याची जागा असेल ते तपासावे लागेल अपर आयुक्त, आदिवासी विकास यांनी अशा प्रकरणांबाबत प्रस्ताव तयार करून मंजुरी घ्यावी. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याशिवाय विभागातील पदे भरण्याकरिता मंत्रीमंडळांची मंजुरी घेतलेली आहे. सुमारे १,३८१ पदांची जाहिरात दिली असून एका आठवडयात परीक्षा होतील. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे असेही प्रधान सचिवांनी विदित केले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

(१) देवरी प्रकल्प कार्यालयांतर्गत येत असलेल्या अनेक आश्रमशाळा मागील ३ वर्षापासून बंद आहेत. आदिवासी विभागाकडून या आश्रमशाळा सुरु करण्याकरिता कोणतेही प्रयत्न न करता आश्रमशाळेतील विद्यार्थी हे नामांकित शाळेत पाठविण्यात आले. समितीने जिल्ह्यातील नामांकित शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यासोबत बसवले जात नसल्याचे तसेच, शाळेत बेडची संख्या कमी असून तेथे जास्त मुले असल्याचे समितीला आढळून आले. यामध्ये लिटील फ्लॉवर्स शाळेचा समावेश होता. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना नामांकित शाळांमध्ये पाठविताना अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडून शाळांचा दर्जा तपासला जातो. परंतु त्याबाबत आदिवासी विभागाकडून योग्य ती पाहणी होत नाही तसेच पाहणी करताना इमारती व खेळाचे मैदान यासोबत तेथील शिक्षकांना इंग्रजीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. याचीही तपासणी करण्यात यावी. अशी समितीने सूचना केली नामांकित शाळांना आदिवासी विभागामार्फत मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो त्याचा विनीयोग योग्य प्रकारे होतो काय याची विभागाने तपासणी करणे आवश्यक आहे. **आदिवासी विभागाने सन २०२१ -२२ हे शैक्षणिक वर्ष संपत असतानाही तसेच नाशिक, ठाणे आणि अमरावती अपर आयुक्तालयांमधून विद्यार्थ्यांना नवीन शाळांमध्ये प्रवेश देण्याचा कोणताही प्रस्ताव नसतांनाही नव्याने ३० नामांकित शाळांना परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे. शासनाने केवळ २५ हजार आदिवासी मुलांना इंग्रजी शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवले होते परंतु अशाप्रकारामुळे ही संख्या ५० हजारावर गेली आहे. यामुळे राज्यातील आश्रमशाळांची संख्या १२ वर्षात ५५० वरून ४९७ पर्यंत खाली आली आहे. ही बाब गंभीर असून शासनाने आदिवासी आश्रम शाळेतच इंग्रजी शिक्षण देऊन या शाळा सक्षम करणे आवश्यक आहे. यावर शासनाने तातडीने उपाययोजना करावी व उपरोक्त प्रकरणी चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी तसेच यासोबतच आदिवासी विद्यार्थ्यांबरोबर दुजाभाव केल्यास नामांकित शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी. तसेच नामांकित शाळेला मान्यता देताना त्या शाळेमध्ये उच्च दर्जाच्या सुविधा आहेत काय व या नामांकित शाळेच्या दर्जा व गुणवत्तेची फेरतपासणी करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा आणि याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) प्रकल्प कार्यालय, देवरी अंतर्गत येणाऱ्या आश्रमशाळांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. यावर साक्षीच्या वेळेस विभागीय प्रतिनिधींनी पेसा क्षेत्रातील पदे भरण्यासाठी **शासनाने सन २०१८ मध्ये १०० टक्के पदे भरण्याची परवानगी दिलेली असल्याने सदर पदे ही भरती प्रक्रिया माहे फेब्रुवारी, २०१९ पर्यंत भरण्यात येतील असे आश्वासित केले होते. सदर रिक्त पदे भरण्यासंदर्भात**

**केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(३) अनुदानित कचारगड आश्रम शाळा, पिंपरी ता. सालेकसा येथे समितीने भेट दिली असता विद्यार्थ्यांची उपस्थिती ही ५० टक्क्यांपेक्षा कमी आढळून आली तसेच दहावीच्या गणित विषयाच्या शिक्षकाला त्यांच्या विषयाचे उत्तर देता आले नाही असे समितीस आढळून आले. यावेळी समितीने सदर आश्रम शाळेचे अनुदान थांबविण्यात यावे तसेच आश्रमशाळेची संच मान्यता, बिंदू नामावली व इतर सर्व माहिती समितीला सादर करण्याबाबत विभागाला निदेश दिले होते. परंतु अद्यापपर्यंत समितीस सदर माहितीचा अहवाल सादर न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, या आश्रमशाळेतील सर्व शिक्षकांच्या गुणवत्तेची तपासणी करणे आवश्यक असल्याने **सर्व शिक्षकांची शैक्षणिक पात्रता तसेच संच मान्यता, बिंदूनामावली व इतर आवश्यक सर्व माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी व प्रकल्प अधिकारी यांनी दर महिन्यांनी त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या आश्रमशाळेच्या शिक्षकांच्या गुणवत्तेबद्दल तपासणी करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(४) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, पाल चौक, गोंदिया येथे समितीने दौऱ्याच्या वेळेस पाहणी केली असता, वसतीगृहामध्ये १०७ मुली राहत असून दोन मुलींना एक बेड तसेच एका कक्षात ३७ मुली वास्तव्य करित असून त्यांच्यासाठी २ स्वच्छतागृहे होती, वसतीगृहामध्ये अधीक्षक नियमित उपस्थित राहत नसल्याचे व वसतीगृहात पुरुष चौकीदार असून तो रात्री वसतीगृहामध्ये झोपत असल्याचे निदर्शनास आले. **सदर वसतिगृहात अनेक वर्षापासून मुलींची गैरसोय होत असून या सर्व गैरसोयीस जबाबदार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी तसेच सदर वसतिगृहात विद्यार्थ्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध करण्यात यावी व याबाबतचा समितीस तीन महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(५) शासकीय आश्रमशाळा, इळदा ता. अर्जुनी मोरगाव येथे समितीने भेट दिली असता, इयत्ता १ ली ते १० वीची पटसंख्या अतिशय कमी आढळून आली. तसेच विद्यार्थ्यांना डीबीटी योजनेद्वारे मिळणारे लाभ देण्यात न आल्याचे, स्वयंपाक घरात मोठ्या प्रमाणात अस्वच्छता, आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देणारी सनविग कॉम्प्युटर्स या कंत्राटी संस्थेने आश्रम शाळेस संगणक न दिल्याचे व विद्यार्थ्यांना संगणक हाताळण्याचे प्रशिक्षण न दिल्याचे निदर्शनास आले. समितीने सदर संस्थेची मान्यता रद्द करून अहवाल सादर करण्यास प्रकल्प अधिकारी यांना निदेश दिले होते तथापि अद्याप अहवाल सादर करण्यात आला नाही. **या विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व सनविंग कॉम्प्युटर्स या संस्थेची मान्यता रद्द करावी व आश्रम शाळेच्या दुरावस्थेस जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून समितीस तीन महिन्याच्या आत अहवाल सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(६) स्वामी विवेकानंद पोस्ट बेसिक आश्रम शाळा पवणी ता. अर्जुनी मोरगाव येथे समितीने पाहणी केली असता तेथील विदयार्थ्यांना बसण्याकरिता व झोपण्यासाठी देखील सोय नव्हती, विदयार्थ्यांना अतिशय निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याचे तसेच स्वयंपाक घरातील धान्य, डाळी व इतर पदार्थ अतिशय निकृष्ट दर्जाचे, वसतीगृहात मुलींना दिलेल्या गादया व ब्लॅकेट अतिशय अस्वच्छ असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत या आश्रम शाळेची सखोल चौकशी करून **या आश्रमशाळेच्या दुरावस्थेस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी यांची चौकशी करून तीन महिन्याच्या आत समितीस अहवाल सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(७) प्रकल्प कार्यालय देवरी अंतर्गत होली क्रॉस कॉन्व्हेंट, बुटी बोरी या नामांकित शाळेमध्ये पाठविण्यात आलेल्या विदयार्थ्यीनीचा मुत्यू झाला होता. संबंधित विदयार्थीनीच्या कुटूंबियांना मदत करण्याबाबत तसेच **आदिवासी आश्रम शाळा व नामांकित शाळेतील मृत्यू झालेल्या विदयार्थ्यांसाठी देण्यात येणाऱ्या सानुग्रह अनुदानाच्या बाबतीत स्पष्ट धोरण ठरवून दोघातील नियम व निकषातील तफावत दूर करण्यासंदर्भात विभागास समितीने निदेश दिले होते. त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(८) राज्यातील अपर आयुक्त कार्यालयातंर्गत येणाऱ्या प्रकल्प कार्यालयामधील प्रकल्प अधिकारी पदांवर पूर्ण वेळ प्रकल्प अधिकाऱ्यांची नेमणूक न करता त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे अनेकदा समितीच्या बैठकीस सदर अधिकाऱ्यांची नेमणूक न करता त्यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे अनेकदा समितीच्या बैठकीस सदर अधिकाऱ्यांना उपस्थित राहता येत नाही. उक्त अधिकारी भारतीय प्रशासन सेवेतील असल्याने त्यांना महसूल विभागाच्या कामाचा देखील अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे विभागाचे कामकाज करणे अडचणीचे ठरत आहे. वास्तविक पाहता एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे आदिवासींसाठी राबवावयाच्या कल्याणकारी योजना व त्या योजनेद्वारे आदिवासीचा विकास व प्रश्न सोडविण्यासाठी स्थापन झाले आहेत. हा विभाग म्हणजे आदिवासींच्या जिव्हाळयाचा भाग असून समितीने वारंवार ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. तरी देखील पूर्ण वेळ प्रकल्प अधिकारी पदांवर आय.ए.एस अधिकाऱ्यांची नेमणूक केलेली नाही. **सबब, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयातील प्रकल्प अधिकाऱ्यांची लवकरात-लवकर पूर्ण वेळ अधिकारी म्हणून नेमणूक करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शासनास शिफारस आहे.**

(९) राज्याच्या अर्थसंकल्पातील अर्थसंकल्पाच्या ९.२७% इतका निधी हा आदिवासी विकास विभागासाठी दिला जातो. सदरहू निधी हा आदिवासींच्या विकासासाठी व आदिवासी विकास विभागातील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्चासाठी खर्च करण्यात येतो. अर्थसंकल्पातील आदिवासी विकास विभागाचा ९.२७% हा पूर्ण निधी आदिवासींच्या विकासासाठी व त्याकरिता विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च करण्याकरिता उपलब्ध करून देण्यात यावा व **इतर विभागाप्रमाणे आदिवासी विकास विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या खर्चासाठी सामान्य प्रशासन व वित्त विभागाकडून स्वतंत्र निधी उपलब्ध करून देण्यात यावा व त्यातूनच कर्मचाऱ्यांचा वेतनाचा खर्च करण्यात यावा. याबाबत आवश्यक कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(१०) राज्यातील बऱ्याच एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयात प्रकल्प आढावा समित्या स्थापन करण्यात आल्या नाहीत. प्रत्येक प्रकल्प कार्यालयात प्रकल्प आढावा समिती स्थापन करून सदरहू समितीवर स्थानिक **आदिवासी लोकप्रतिनिधींना तसेच त्या मतदार संघातील विधीमंडळाच्या सदस्यांना समितीत स्थान देण्यात यावे, याबाबत विभागाकडून सर्व एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयास सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(११) जिल्हा परिषद गोंदिया तसेच एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय देवरी अंतर्गत आदिवासी उपयोजनेचा निधी हा आदिवासी बाह्य उपयोजना क्षेत्रात खर्च करण्यात येत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व **यापुढे आदिवासी उपयोजनेचा निधी हा आदिवासी उपयोजना क्षेत्रातच खर्च करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.**

(१२) आदिवासी उपयोजना व बाह्ययोजना क्षेत्रात जिल्हापरिषदेच्या रस्त्यांच्या दुरुस्ती व परिरक्षण हा कार्यक्रम "३०५४" या लेखाशिर्षातंर्गत निधीसह सन २०१२ च्या आधी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येत होता. सन २०१२ -१३ या आर्थिक वर्षापासून सदरहू कार्यक्रम "३०५४" या लेखाशिर्षातंर्गत निधीसह ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरित करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील रस्ते दुरुस्तीच्या कामांचा गुणवत्तेचा दर्जा कमी झाला आहे. तसेच या कामांसाठी निधीची मागणी, मान्यता व उपलब्धतेसाठी जिल्हापरिषदेकडून बराच कालावधी लागत असल्याने

तसेच रस्त्यांची कामे विहित वेळेत पूर्ण होत नसल्याने याचा जिल्ह्याच्या विकास कामांवर परिणाम होतो यामुळे ‘‘३०५४’’ **या लेखाशिर्षातंर्गत या योजनेवर होणाऱ्या खर्चाच्या निधीसह रस्त्यांचा दर्जा सुधारणे तसेच विहित वेळेत ही कामे पूर्ण होण्याकरिता ग्रामविकास विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करून सदर कामे पुर्वीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडूनच करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करण्यात यावी, अशी शासनास समितीची शिफारस आहे.**

# (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

## पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(६) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(७) श्री. संतोष टारफे, वि.स.स.

(८) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(९) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१०) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(११) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

**जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया :—**

(१) श्री. अभिमन्यु काळे, जिल्हाधिकारी, गोंदिया

(२) श्री. अशोक तटारे, अपर जिल्हाधिकारी, गोंदिया

(३) श्री. प्रविण माहिरे, निवासी उप जिल्हाधिकारी, गोंदिया

**वन विभाग**

श्री. एन. एच. शेंडे, सहायक वन संरक्षक

**जिल्हा परिषद, गोंदिया :—**

(१) श्री. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(२) श्री. प्रभाकर गावडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(३) श्री. सुधीर वाळके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(४) श्री. एन. के. भांडारकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा)

(५) श्री. आर. व्ही. राठोड, उप मुख्य कार्यकारी (पाणी व स्वच्छता)

(६) श्री. बी.डी. पारखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मावक)

(७) श्री. अ.क. मडावी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. आर.एस. वैरागकर, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(९) श्री. एस.एफ. विश्वकर्मा, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, गोंदिया

(१०) श्रीमती वंदना ता. शिंदे, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया

(११) श्री. एम. आर. रामटेके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

(१२) श्री. डॉ. राजेश वासनिक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. उल्हास के. नरड, प्राथमिक शिक्षणाधिकारी

(१४) श्री. एस. डी. निमगडे, आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया :—**

श्री. एल. एम. बोरीकर, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया.

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी :—**

(१) श्री. सुरेन्द्र सावरकर, उपायुक्त, आदिवासी विकास, नागपूर

(२) श्री. जितेंन्द्र एन. चौधरी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी

(३) श्री. एल. एच. भोंगाडे, सहायक प्रकल्प अधिकारी, देवरी

(४) श्री. जे. पी. राजूरकर, प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, भंडारा

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, गोंदिया, वन विभाग, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्याच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

## दुसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थितीः**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(५) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(६) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(७) श्री. संतोष टारफे, वि.स.स.

(८) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(९) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१०) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(११) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

**विभागीय प्रतिनिधी :**

**जिल्हाधिकारी कार्यालय व वन विभाग, गोंदिया :—**

(१) श्री. अभिमन्यु काळे, जिल्हाधिकारी, गोंदिया

(२) श्री. एन. एच. शेंडे, सहायक वन संरक्षक

**जिल्हा परिषद, गोंदिया :—**

(१) श्री. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(२) श्री. प्रभाकर गावडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(३) श्री. सुधीर वाळके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

(४) श्री. एन. के. भांडारकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (नरेगा)

(५) श्री. आर. व्ही. राठोड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता)

(६) श्री. बी.डी. पारखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मावक)

(७) श्री. अ.क. मडावी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. आर.एस. वैरागकर, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग

(९) श्री. एस.एफ. विश्वकर्मा, कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, गोंदिया

(१०) श्री. वंदना ता. शिंदे, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया

(११) श्री. एम. आर. रामटेके, जिल्हा समाज कल्याण अधिकारी

(१२) श्री. डॉ. राजेश वासनिक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१३) श्री. उल्हास के. नरड, प्राथमिक शिक्षणाधिकारी

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया :—**

श्री. एल. एम. बोरीकर, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी :—**

(१) श्री. सुरेन्द्र सावरकर, उपायुक्त, आदिवासी विकास, नागपूर

(२) श्री. जितेंन्द्र एन. चौधरी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी

(३) श्री. एल. एच. भोंगाडे, सहायक प्रकल्प अधिकारी, देवरी

(४) श्री. जे. पी. राजूरकर, प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ, भंडारा

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया वन विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी, या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

## तिसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ५ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(२) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(३) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.

(४) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.

(५) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(६) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(७) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. अरविंद सिंह, प्रधान सचिव, ऊर्जा विभाग

(२) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

(३) श्री. विकास खारगे, प्रधान सचिव, वन विभाग

(४) श्री. असीम गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

(५) श्री. अशोक लटारे, अपर जिल्हाधिकारी, गोंदिया

(६) श्री. राजा दयानिधी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(७) श्री. ह्षीकेश मोडक, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर

(८) श्री. नरेश भांडारकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया

(९) श्री. विनोद पाटील, सह आयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर

(१०) श्री. जितेन्द्र एन चौधरी, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी.

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातंर्गत येत असलेल्या यंत्रणा वन विभाग, गोंदिया, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, गोंदिया, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, देवरी, जिल्हा परिषद, गोंदिया या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित विभागीय सचिवांबरोबर चर्चा केली.

**चौथी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक बुधवार, दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) श्री. दौलत दरोडा, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**समिती सदस्य :**

(१) श्री. शिरीष चौधरी, वि.स.स.

(२) श्री. सहसराम कोरोटे, वि.स.स.

(३) डॉ. तुषार राठोड, वि.स.स.

(४) श्री. राजकुमार पटेल, वि.स.स.

(५) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

(६) श्री. किरण सरनाईक, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(३) श्री. मोहन काकड, अवर सचिव

(४) श्री. मनोज येसनसुरे, कक्ष अधिकारी.

**समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई